अस्सल सोलापुरी

# सुराज्य

सोलापूर

सोलापूर, पुणे, सांगली, उस्मानाबाद, लातूर, विजापूर, गुलबर्गा, बिदर, बीड

www.surajyadigital.com | सोमवार, दि. २० मार्च २०२३ | ▸ वर्ष : २१ वे ▸ अंक : १७० वा किंमत : ५ रुपये ▸ पाने ८

## रोपळे येथे तरुणाला मोटारीतून पळवून खुनाचा प्रयत्न; ७ जणांविरुद्ध गुन्हा दाखल

**सोलापूर** : घरातील एका महिलेसोबत फोनवरून बोलण्याच्या संशयावरून एका तरुणाला स्कार्पिओ वाहनातून पळवून नेऊन बेदम मारहाण करीत खुनाचा प्रयत्न करण्यात आला. ही घटना रोपळे (ता. पंढरपूर) येथे शुक्रवारी सकाळच्या सुमारास घडली. या प्रकरणात पंढरपूर तालुक्याच्या पोलिसांनी हर्षवर्धन मगर (रा.गारवाड ता. माळशिरस) याच्यासह ७ जणाविरुद्ध खुनाचा प्रयत्न केल्याचा गुन्हा दाखल केला आहे.

किरण सर्जेराव लोखंडे (वय २० रा. रोपळे, ता.पंढरपूर) असे जखमीचे नाव आहे. त्याने दिलेल्या फिर्यादीवरून पोलीसांनी चेतन्य पाटील, आकाश बाबू मुळे, महादेव भोसले, रोहित कांबळे (सर्व रा. मोहोळ तालुका परिसर), हर्षवर्धन दादासाहेब मगर (रा.गारवाड, ता. माळशिरस), राजू भंडारे (रा.सोलापूर) आणि योगेश ढोले (रा.शिरूर जि.पुणे) ७ जणाविरुद्ध गुन्हा दाखल केला. वरील सर्व आरोपींनी शुक्रवारी सकाळी ११ वाजेच्या सुमारास किरण लोखंडे याला रोपळे येथून एमएच१३-एजी ७००० या स्कार्पिओ मोटारीत बळजबरीने बसवून घेतले. त्यानंतर त्याला बाभुळगाव येथील हॉटेल सम्राट येथे नेऊन जेवण घातले. जेवण झाल्यानंतर त्याच मोटारीतून भालवणी त्यानंतर पिलीव येथील कॅनल जवळ सायंकाळच्या सुमारास नेले. आणि त्याला लोखंडी पाईप, काठी आणि लाथाबुक्याने बेदम मारहाण केली. तर हर्षवर्धन मगर याने तुला आता संपवतो असे म्हणत त्याच्यावर लोखंडी पाईप हल्ला केला. अशी नोंद पोलिसात झाली. पुढील तपास फौजदार जाधव करीत आहेत.

# श्री पार्श्वनाथांच्या देखत तुफान हाणामारी भक्तांची डोकी फुटली, कंबरडेही मोडले

## मूर्तीला लेप लावण्यावरून शिरपूरमध्ये जैन समाजातील दोन पंथ भिडले

सुराज्य/विशेष प्रतिनिधी

**सकल जैन समाजाची काशी म्हणून उभ्या राज्यात ओळख असलेल्या वाशिम जिल्ह्यातील शिरपूरमधील भगवान पार्श्वनाथ मंदिरासमोर रविवारी तुफान राडा झाला. मूर्तीच्या लेपनावरून श्वेतांबर आणि दिगंबर या पंथांमधील भक्त एकमेकांवर चाल करून गेले. वाद इतका विकोपाला गेला की, एकमेकांना लाथा-बुक्क्या घातल्या. एकमेकांच्या अंगावर चपला आणि खुर्च्या फेकल्या गेल्या. ४२ वर्षांनी हे मंदिर उघडले गेले पण जे व्हायचे तेच झाले. अखेर दोन पंथ एकमेकांना भिडले. यात एक तरूण गंभीर जखमी झाला. जगाला शांततेचा संदेश देणाऱ्या भगवान पार्श्वनाथांच्या मंदिरासमोरच हा तमाशा झाल्याने जैन समाजातील जाणकारांमधून संताप व्यक्त केला जात आहे.**







याबाबतचे सविस्तर वृत्त असे की- या पार्श्वनाथ मंदिरातील देव कुणाचा यावरून जैन धर्मियांच्या दोन पंथीयांमध्ये वाद झाल्यानंतर ४२ वर्ष मंदिराचे दार बंद झाले होते. सर्वोच्च न्यायालयाने मंदिराचे दार उघडण्याचे आदेश दिले, मात्र दार उघडे होताच पुन्हा तोच जुना वाद समोर आला. शिरपूर जैन या गावात भगवान पार्श्वनाथांच्या मूर्तीवरच्या लेपनावरुन श्वेतांबर आणि दिगंबर पथियांमध्ये फ्री स्टाईल हाणामारी झाली. श्वेतांबर पंथियांनी लेपनाच्या बहाण्याने मूर्तीचे रुपच बदलण्याचा घाट घातल्याचा आरोप दिगंबर पंथियांनी केला. पार्श्वनाथांच्या मूर्तीच्या सुरक्षेसाठी श्वेतांबर पंथियांनी बाऊंसर लावले. वादाला तोंड फुटले आणि प्रकरण हाणामारीपर्यंत गेले.एकमेकांच्या अंगावर खुर्च्या फेकल्या गेल्या. एकमेकांना लाथा-बुक्क्या मारल्या गेल्या. त्यात कुणाची डोकी फुटली तर कुणाचे कंबरडे मोडले. अखेर श्वेतांबर पंथियांनी लेपन प्रक्रिया थांबवली. दोन्ही पंथीयांमध्ये १२५ वर्षांपासून मूर्ती हक्कावरून वाद सुरु आहे. त्यातूनच मंदिराला अखेर कुलुप लागले. त्यानंतर ४२ वर्षानंतर मंदिराचे दार उघडलं. दर्शनासाठी मंदिर खुले करण्याचे आणि मूर्तीला लेप करण्याचे कोर्टाने आदेश दिले. ११ मार्च रोजी श्वेतांबर पथांकडे मंदिराच्या चाव्या देण्यात आल्या. पण मूर्तीला लेपनचा अधिकार श्वेताबंर पंथियांना दिला होता. लेपन करण्यासाठी श्वेताबंर पंथियांनी कुलुप लावले. १४ मार्च रोजी दिगंबर पंथियांनी मंदिराचा दरवाजा उघडून प्रवेश मिळवला. मंदिराचा दरवाजा चुकिच्या पद्धतीने उघडल्याचा आरोप श्वेतांबर पंथियांनी केला. त्यानंतर वाढलेल्या तणावामुळे शनिवारी दिवसभर या ठिकाणी पोलिस बंदोबस्त ठेवण्यात आला होता. जुन्याजाणत्यांनी दोन्ही पंथियांमध्ये समेटही घडवली. पण ही अहिंसक वृत्ती जेमतेम तासभर टिकली आणि पुन्हा सुरु झाली फ्री स्टाईल हाणामारी.

### तर सगळंच व्यर्थ आहे.

गेली अनेक दशके मंदिराच्या मूर्ती हक्कावरून वाद झाला आणि परिणामी ४२ वर्ष वाया गेले. चुकीच्या पद्धतीने पुन्हा टाळे लावणे योग्य नसून सर्वोच्च न्यायालयाने मंदिर उघडल्याने गावाचा आणि परिसराचा विकास होईल असे वाटले होते. दोन्ही पंथीयांने सामोपचाराने मार्ग काढावा आणि जर मार्ग काढता येत नसेल तर प्रशासनाने ताब्यात घेऊन मंदिर दर्शनासाठी नेहमी उघडे करावे, अशी मागणी जैन समाजातील जाणकारांकडून होत आहे.

### अखेर विरजण पडले...

लेप लावण्याच्या कारणावरून पुन्हा दोन महिने मंदिराचे दार बंद करणे चुकीचे आहे. टाळे माणसाला लागतात देवाला नाही. मंदिर, मस्जिद, गुरुद्वाराला कुलूप लावणे चुकीचे आहे. शांततेच्या मार्गाने तोडगा काढा. मंदिर उघडे ठेवून लेप प्रक्रिया पार पाडावी, अशी मागणी महंत शिधांतसागर महाराज यांनी केली. १९१० पासून दिगंबर आणि श्वेतांबर पंथीयामध्ये देव कुणाचा म्हणून वाद सुरु आहे. ५७ वर्ष प्रीव्ही कॅउन्सीलच्या न्यायलयात हा वाद सुरु होता. लेप करण्यावरून पुन्हा वाद निर्माण झाला. १९६० मध्ये पुन्हा वाद निर्माण झाला आणि तो १९८२ पर्यंत चालला. तेंव्हा मंदिराला पुन्हा टाळे लागले. ते आता उघडण्यात आले.पण भक्तांच्या आनंदावर अखेर विरजण पडले.

## नव वर्षात ऊस वाहतूक ट्रॅक्टरचे अपघात घटले

### परिवहन आयुक्त भीमनवार : जनजागृतीचा होतोय फायदा

सुराज्य/सोलापूर

पुणे विभागात रस्ते अपघातात सोलापूरचा चौथा क्रमांक लागत असून, नवीन वर्षापासून सुरू करण्यात आलेल्या जनजागृतीमुळे उस वाहतूक करणाऱ्या ट्रॅक्टरच्या अपघातात तीन टक्क्यांनी घट झाली आहे अशी माहिती राज्याचे परिवहन आयुक्त विवेक भीमनवार यांनी रविवारी पत्रकार परिषदेत दिली.

परिवहन आयुक्त विवेक भीमनवार हे दोन दिवसाच्या सोलापूर दौऱ्यांवर आले होते. शनिवारी कोल्हापूर, सांगली आरटीओ कार्यालयाच्या अपघाताचा आढावा त्यांनी घेतला. रविवारी सोलापूर विभागाचा आढावा घेतला. या बैठकीला राष्ट्रीय महामार्ग प्राधीकरणचे चिटणीस, अपर पोलीस अधीक्षक जाधव, शहर वाहतूक पोलीस निरीक्षक सिद, बांधकाम विभागाचे अधिकारी उपस्थित होते. त्यानंतर आयोजित पत्रकार परिषदेत त्यांनी सोलापूर विभागात रस्ता सुरक्षा जनजागृतीचा चांगलाच फायदा झाल्याचे स्पष्ट केले. राज्यात दरवर्षी रस्ते अपघातात १५ हजार मृत्यू होतात. पुणे, नगर, नाशिक, सोलापूर जिल्ह्यात ७० टक्के लोक रस्ते अपघातात मरण पावत आहेत. या अनुषंगाने या जिल्हयांचा दौरा करून आढावा घेतला आहे. सोलापूर जिल्ह्याची २००८ पासून रस्ते अपघाताची आकडेवारी पाहिल्यास ८ ते १५ टक्के वाढ दिसून येते. त्यामुळे रस्ते अपघात कमी करण्यासाठी परिवहन विभागाने जनजागृतीवर भर दिला आहे. यात प्रत्येक कार्यालयास वेगळा उपक्रम राबविण्याची सूचना केली आहे. सोलापुरात प्रत्येक तालुक्याला एका मोटार वाहन निरीक्षकाची नियुक्ती केली आहे. त्यामुळे गेल्या दोन महिन्यात रस्ते अपघातात ३ टक्के घट दिसत आहे.

सोलापूर जिल्ह्यात साखर कारखान्यांची संख्या मोठी आहे. त्यामुळे उस वाहतूक करणारे ट्रॅक्टर जास्त आहेत. जनजागृतीमुळे ट्रॅक्टरचे अपघात घटल्याचे दिसून येत आहे. यात सर्व यंत्रणांनी समन्वयाने काम केल्याने जास्त परिणाम दिसून येत आहे. सोलापुरात ६५ टक्के अपघात दुचाकींचे आहेत. यात २४ टक्के पादचाऱ्यांचा मृत्यू झाला आहे. ७४ टक्के अपघात ग्रामीण भागातील आहेत. सायंकाळी ६ ते मध्यरात्री बारा वाजेच्या काळात ग्रामीण भागात सर्वाधिक दुचाकींचे अपघात झाल्याचे दिसून येत आहे. वेगामुळे अपघात वाढले आहेत.



### वेगावर नियंत्रण आणणार

हायस्पीडमुळे सर्वाधिक अपघात होत आहेत. यावर नियंत्रण आणण्यासाठी आरटीओ कार्यालयाला स्पीडगन मोजणारे वाहन देण्यात येणार आहे. या वाहनाद्वारे दंडात्मक कारवाई वाढविण्यात येणार आहे. त्याचबरोबर जिल्हा नियोजनमधून रस्ते सुरक्षेसाठी निधी देण्याची तरतूद करण्यात आली आहे. त्यातून उपाययोजनेसाठी वेगवेगळे प्रयोग करण्यात येणे शक्य होणार आहे.

## पुजाऱ्याच्या धाडसामुळे देवीच्या पादुका चोरणारा जेरबंद

सुराज्य/पंढरपूर

श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिराच्या परिवार देवता पैकी एक असणाऱ्या श्री अंबाबाई देवी मंदिरातील पितळेच्या पादुका चोरून नेणाऱ्या चोरट्यास समितीच्या पुजाऱ्याने पाठलाग करून पोलिसांच्या ताब्यात दिले.

याप्रकरणी पंढरपूर तालुक्यातील आढीव येथील बाळू मच्छिंद्र खाडे याच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. घटनेची माहिती अशी की, श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिर समितीच्या अंतर्गत २८ परिवार देवता असून यापैकी चंद्रभागेच्या काठावर अंबाबाई देवींचे मंदिर आहे.

रविवारी सकाळी नेहमीप्रमाणे येथील पुजारी महेश दिलीप मंजरतकर हा सकाळी पूजा केल्यानंतर मंदिरातील परिसराची स्वच्छता करीत असताना देवीच्या समोरील पाच किलो वजनाच्या दर्शनासाठी ठेवलेल्या पितळी पादुका नसल्याचे त्याच्या लक्षात आले. सदर पादुकांचा शोध घेत असताना मंदिराच्या दरवाज्यातून एक व्यक्ती पळून जाताना मंजरतकर याने पाहिले. संशय आल्यामुळे त्याने सदर व्यक्तीचा पाठलाग करून त्यास महाद्वार येथे पकडले. सदर चोरट्यास पोलिसांच्या ताब्यात देण्यात आले आहे.

## उजनीतून भीमेत तीन हजार क्युसेकचा विसर्ग

सुराज्य/सोलापूर

सोलापूर शहराला पाणी पुरवठा करणारा बंधारा कोरडा पडत चालल्याने महापालिकेने उजनीतून भीमा नदीत पाणी सोडण्याची मागणी केली होती. त्यानुसार सोलापूर शहर व नदीकाठावरील योजनांसाठी धरणातून रविवारी सकाळी अकरा वाजल्यापासून पाणी सोडण्यास सुरूवात झाली आहे. सायंकाळी भीमा नदीत वीज निर्मितीसाठी १६०० तर सांडव्यातून १४०० असा तीन हजार क्युसेकचा विसर्ग सोडला जात आहे.

धरणातून सुरूवातीला वीज निर्मितीसाठी १६०० क्युसेकने पाणी सोडले जात असून हळूहळू नदीतील विसर्ग हा वाढविला जाणार आहे. सध्या तीव्र उन्हाळा व वाढता पाणी वापर यामुळे बंधारे कोरडे पडू लागले आहेत. पंढरपूर जवळील गुरसाळे बंधाऱ्याच्या प्लेट चोरीला गेल्याने यातूनही पाणी गळती होवून बंधारा कोरडा पडला आहे. यासाठी भीमेत पाणी सोडण्याची मागणी होत होती. मे महिन्या पहिल्या आठवड्यापर्यंत दोन्ही कॅनॉल सुरूच राहणार आहेत, यामुळे या काठावरील सिंचनाची सोय झाली आहे.

दरम्यान उजनी धरणातून किमान पाच टीएमसी पाणी भीमा नदीत सोडले जाईल. सोलापूरला पाणी पुरवठा करणाऱ्या बंधाऱ्यापर्यंत पाणी पोहोचल्यावर हे आवर्तन बंद होईल. सध्या उजनी धरणात ५४.२१ टक्के म्हणजे २९ टीएमसी पाणी उपयुक्त पातळीत शिल्लक आहे. एकूण साठा हा ९२.७० टीएमसीचा आहे. धरणातून कालव्यात ३ हजार, सीना भीमा जोडकालव्यात १ हजार, सीना माढा जोडकालव्यात ३३३ तर दहिगाव योजनेत १२० क्युसेकने पाणी सोडले जात आहे.



### 'गोळीबार' मैदानावर मुख्यमंत्र्यांची फायरिंग...

## हा शिंदे गद्दार नाही, खुद्दार आहे, सत्तेसाठी मिंधा झालो नाही

सुराज्य/रत्नागिरी



ज्या काँग्रेसने देशाला लुटले, ज्यांनी मुंबईत बॉंबस्फोट घडवले, त्यांच्यासोबत केवळ सत्तेसाठी मांडीला मांडी लावून बसलात, अशी टीका मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी उद्धव ठाकरे यांच्यावर केली. काश्मीरमधील ३७० कलम मोदींनी हटवले, ज्यांनी राम मंदिराची उभारणी केली, ज्यांनी बाळासाहेबांचे स्वप्न पूर्ण केले, त्यांच्यासोबत जाण्याची आमची भूमिका चुकीची कशी? असा सवालही त्यांनी विचारला. हा शिंदे गद्दार नाही, खुद्दार आहे, शिंदेच्या रक्तात बेईमानी नाही, आम्ही तुमच्यासारखे सत्तेसाठी मिंधे झालेलो नाही,अशा सडेतोड शब्दात त्यांनी ठाकरेंना टोले लगावले.


शिवसेनेचा बालेकिल्ला असलेल्या खेडच्या गोळीबार मैदानावर आयोजित केलेल्या विशाल सभेला संबोधित करताना मुख्यमंत्री बोलत होते. काही दिवसांपूर्वी खेडच्या याच मैदानावर उद्धव ठाकरे यांनी सभा घेतली होती. त्यावेळी त्यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यावर टीका केली होती. आता त्याच मैदानावरून एकनाथ शिंदे यांनी उद्धव ठाकरे यांना प्रत्युत्तर दिले. सभेला न भूतो न भविष्यती असा प्रतिसाद मिळाला. पुढे बोलताना शिंदे म्हणाले की, उद्धव ठाकरे यांनी आधी मुख्यमंत्री होणार नाही असे सांगितले. त्यानंतर पवारांनी सांगितले असे म्हणत मुख्यमंत्री झालात. तेही ठीक, पण त्यानंतर तुम्ही हिंदुत्वाची भूमिका सोडली.

# मदतीसाठी आजी-माजी आमदारांसह अधिकारी शेतकऱ्यांच्या बांधावर

## जिल्ह्यात एकूण ३,४६९ हेक्टर तर पंढरपूर तालुक्यात १८०० हेक्टर क्षेत्रावरील पिकांचे अवकाळीने नुकसान

### तिसरा डोळा

– प्रकाश पोरे




अंत पाहत आहे !!!

सुराज्य/सोलापूर

अवकाळी पावसाने व गारपिटीने नुकसान झालेल्या पिकांचे तत्काळ पंचनामे करुन अहवाल सादर करावा व शेतकऱ्यांना आधार देण्यासाठी पंढरपूरचे आजी माजी आमदार अधिकाऱ्यासह नुकसानग्रस्त शेतकऱ्यांच्या बांधावर उतरले व नियम, निकष बाजूला ठेवून पंचनामे करून अहवाल सादर करण्याच्या सूचना आमदार समाधान आवताडे यांनी रविवारी दिल्या आहेत.

पंढरपूर तालुक्यातील गोपाळपूर येथील लेंगरे वस्ती, मस्के वस्ती तसेच मुंडेवाडी व कोंढारकी येथील नुकसानग्रस्त द्राक्ष, आंबा, गहू आदी पिकांची पाहणी केली. यावेळी त्यांच्या समवेत प्रांताधिकारी गजानन गुरव, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी बाळासाहेब शिंदे, तहसीलदार सुशील बेल्हेकर, गटविकास अधिकारी प्रशांत काळे, तालुका कृषी अधिकारी भागवत सरडे, मंडळ अधिकारी बाळासाहेब मोरे तसेच तलाठी, ग्रामसेवक, कृषी सहायक उपस्थित होते.



अवकाळी पाऊस व गारपिटींने हातातोंडाशी आलेले आलेले पीक उद्ध्वस्त झाले आहे. सर्व नुकसानग्रस्त शेतकऱ्यांच्या पाठीशी शासन ठामपणे उभे असून तत्काळ मदतीची मागणी करण्यात येईल, असेही आ. आवताडे यांनी सांगितले.

तालुक्यातील नुकसानग्रस्त शेतपिकांचे तत्काळ पंचनामे सुरु करण्यात आले असल्याचेही गुरव यांनी सांगितले.

### नियम, निकष बाजूला ठेवून पंचनामे करा

अवकाळी पाऊस व गारपीटमुळे पंढरपूर तालुक्यातील ३००० हून अधिक शेतकऱ्यांना फटका बसला असून सर्व नियम निकष बाजूला ठेवून याचे पंचनामे करण्याची सूचना प्रशासनास केली. शेतकरी आपल्या कुटुंबाप्रमाणे पिकाला जपतो. मात्र ज्यावेळी हातात काही पैसे पडण्याची वेळ येते, त्यावेळी नैसर्गिक संकटामुळे सर्व काही वाहून जाते. शनिवारी झालेल्या पाऊस व गारपिट मुळे हजारो शेतकऱ्यांचे न भरून येणारे नुकसान झाले आहे. शेतकऱ्यांना यामधून आधार द्यावा यासाठी आपण शासन दरबारी हा विषय लावून धरणार आहे.अधिकाऱ्यांनी पंचनामे करताना पिकांची नोंद आहे का ? किंवा इतर नियमावर बोट न ठेवता सरसकट जागेवर कोणते पीक आहे किती नुकसान झाले आहे याचे तातडीने पंचनामा करावेत. – **प्रशांतराव परिचारक**

### पंचनामे सुरू

सोलापूर जिल्ह्यातील आठ तालुक्यातील १०४ गावांमध्ये गारपीट व पावसामुळे शेतीचे मोठे नुकसान झाले आहे. यामध्ये सुमारे ३ हजार ४६९ हेक्टर क्षेत्राचे नुकसान झाले असून ४ हजार ५०० शेतकरी हे बाधित झाले आहेत. अवकाळी पावसाने व गारपिटीने द्राक्ष आंबा, पपई, टरबूज, कलिंगड अशा फळबागांचे तर ज्वारी, गहू, हरभरा अशा पिकांचे मोठे नुकसान झाले. सर्व नुकसानग्रस्त परिसराचे पंचनामे कृषि विभागाकडून सुरू करण्यात आले आहेत

**–बाळासाहेब शिंदे (जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी)**

# भान ठेवून बोला...

भारतीय जनता पक्षाचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी जागा वाटपाविषयी केलेल्या वक्तव्यावरून शिंदे-फडणवीस युतीत एका नव्या वादाची ठिणगी पडली आहे. ह्यांचे सरकार स्थापन झाल्यानंतर हा पहिलाच वणवा म्हणावा लागेल. तो शांत होईल की अजून भडकत राहील हे येत्या काळात पहायला मिळेल. हा वणवा युतीसाठी धोकादायक आहेच. शिंदे गटाचे आमदार संजय शिरसाट यांनी बावनकुळेंना जशास तसे उत्तरही दिले आहे. शिंदे गटाचा आक्रमकपणा पाहाता बावनकुळेंनी सारवासारव करायला सुरुवात केली. भूमिका ठाम नसेल तर कसे तोंडघशी पडावे लागते,याचा अनुभव बावनकुळेंना यातून आलेला असावा. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या पाठीमागे ४० आमदार धावून येतात हा काही जोक नाही. राज्यात त्यांचीही ताकत आहे. शिवसेना एकसंध होती तेव्हा युतीमुळे भाजपची ताकत राज्यात वाढली आहे. आघाडी आणि युतीशिवाय कुठल्याच राजकीय पक्षांना पर्याय उरलेला नाही.स्वबळाचे राजकारण आता संपले आहे. केडर पार्टीचे अध्यक्ष असलेल्या बावनकुळेंना ही बाब लक्षात कशी येत नाहीय. आता तर शिंदे गट पेटून उठेलच शिवास आठवलेंचा रिपाइं आणि महादेव जानकर यांचा राष्ट्रीय समाज पक्ष या दोन पक्षांनी डोके वर काढत भाजपच्या नाकात कांदा पिळू लागले आहेत.आमचीही भाजपशी युती आहे. आमच्या जागांचे काय करणार? असा प्रश्न रामदास आठवले यांनी उपस्थित केला आहे तर आमच्याशी युती करणार की नाही हे भाजपने स्पष्ट करावे, असे आव्हान जानकर यांनी दिले आहे. भाजप नसता आक्रमकपणा व आगाऊपणा करत आहे, असे खेदाने म्हणावे लागेल. बावनकुळे यांनी भाजप आगामी विधानसभा निवडणुकीत २४० जागा लढवेल असे जाहीर केल्याने मग शिंदे गटाला केवळ ४८ जागा मिळणार काय, आठवले यांचा रिपाइं तसेच महादेव जानकर यांचा राष्ट्रीय समाज पक्ष यांना किती जागा मिळणार, असे प्रश्न निर्माण होणे स्वाभाविकच



आहे. याखेरीज कोल्हापूर जिल्ह्यातील विनय कोरे यांच्या जनसुराज्य पक्षाचीही भाजपशी जवळीक आहे. विनायक मेटे यांचा शिवसंग्राम पक्षही भाजप आघाडीत आहे. या पक्षांबाबत काय भूमिका आहे, या प्रश्नांची उत्तरे शोधावी लागतील. अर्थात बावनकुळे यांनी सारवासारव करत जागावाटप निश्चित झाले नसल्याचा खुलासा केला. भाजपची सर्व २८८ मतदारसंघात तयारी केली जात आहे असे त्यांनी नमूद केले. मात्र, यातून भाजपचे उद्दिष्ट स्पष्ट होते.गेल्या विधानसभेला भाजपने १६४ जागा लढवल्या होत्या तर शिवसेनेच्या वाट्याला १२६ जागा आल्या होत्या. आता केंद्रात आठ वर्षे भाजपचे सरकार आहे. त्यामुळे आता साहजिकच मोठा भाऊ भाजपच राहणार. मग जर खरेच भाजपने २४० जागा लढवल्या तर, मग शिंदे गटाचे आताच ४० आमदार आहेत. केवळ आठच अतिरिक्त जागा त्यांना मिळतील. त्यांच्या पक्षात अनेक नवे कार्यकर्ते प्रवेश करत आहेत. जागावाटप सूत्र ठरले असेल, तर मग या नव्या कार्यकर्त्यांना कसे सामावून घेणार? जागावाटप हे केंद्रात ठरते, त्यामुळे भाजपचे श्रेष्ठीच त्याबाबत निर्णय घेणार, मग अशा वेळी बावनकुळे यांच्यासारख्या अनुभवी नेत्याने असे वक्तव्य करून सरकारमधील दोन पक्षांमध्ये अस्वस्थता निर्माण केली. उठसूट बोलू नका असा मौलिक सल्ला त्यांनी प्रवक्त्यांना दिला. मग बावनकुळेच अपवाद कसे ठरतील? पंजाबमधील अकाली दल तसेच ठाकरे गट हे दोन जुने मित्र राष्ट्रीय लोकशाही पासून दुरावले आहेत. हे दोन्ही पक्ष जवळपास तीन दशके भाजपबरोबर होते. वैचारिक दृष्ट्याही हे दोन पक्ष भाजपला जवळचे होते. तर नितीशकुमार यांचा संयुक्त जनता दलही आघाडीत नाही. तामिळनाडूतील अण्णा द्रमुकचे भाजपशी तितके सौहार्दाचे संबंध नाही. जयललितांच्या पश्चात या पक्षात नेतृत्वाचा अभाव आहे. त्यामुळेच द्रमुकने स्थान भक्कम केले. भाजपच्या आघाडीत ईशान्येकडील छोटे पक्ष आहेत. बिहारमध्ये मुकेश साहनी, जितनराम मांझी यांचे पक्षही आज भाजपपासून दूर गेले आहेत. लोकजनशक्ती पक्ष राष्ट्रीय लोकशाही आघाडीत आहे. पण त्यांची ताकद मर्यादित आहे. भाजप मित्रांचा वापर करते, असा काही जणांचा आरोप आहे. अशा स्थितीत महाराष्ट्रात भाजप प्रदेशाध्यक्षांनी २४० जागा लढण्याचे लक्ष्य ठेवल्यास, मित्रपक्षांनी नुसता प्रचार करायचा काय, हा सवाल आहे.राज्यात भाजपपुढे महाविकास आघाडी उभी आहे. तीन प्रमुख पक्षांनी जर महाविकास आघाडीचा प्रयोग केला तर भाजपपुढे किती मोठे आव्हान निर्माण होऊ शकते, हे पुण्यातील कसबा मतदार संघातील निकालाने दाखवून दिले आहे. अशा वेळी राज्यात भाजपला मित्रपक्षांना महत्त्व द्यावे लागणार आहे. बावनकुळे यांच्या वक्तव्याने विरोधकांना भाजपच्या मित्रांना डिवचण्याची संधी मिळाली आहे. प्राप्त परिस्थितीत शिंदे गटाला डिवचून चालणार आहे.भाजपच्या सत्तेची मदार शिंदे गटावरच असणार आहे. मित्रपक्षांमध्ये सौहार्द राहावा यासाठी त्यांना दुखावणे टाळले पाहिजे. त्यामुळेच कार्यकर्त्यांचे मनोधैर्य उंचावण्यासाठी जरी असे वक्तव्य केले असले तरी, त्यातून शह-काटशहाचे राजकारणही वाढीला लागण्याचा धोका आहे.

सामाजिक

# पेन्शनसाठी महाराष्ट्र वेठीला

**देशातील ६० लाख ३२ हजार सरकारी कर्मचारी हे नवीन पेन्शन योजनेत आहेत. नवीन योजना अन्यायकारक असून जुनी पेन्शन योजनाच लागू करावी, या मागणीसाठी राज्यातील अठरा लाख सरकारी कर्मचाऱ्यांनी संपाचे हत्यार उपसले आणि सारे प्रशासन ठप्प झाले. सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांच्या व्यथा कोणी जाणूनच घेत नाही, ही त्यांची व्यथा आहे. संघटित शक्तीच्या बळावर आपण काय करू शकतो, हे राज्य कर्मचाऱ्यांना दाखवून दिले. राज्य कर्मचाऱ्यांना कोणतेही सरकार दुखवू शकत नाही, हे संघटनांच्या नेत्यांना ठाऊक असते. अशा संपाला चतुर्थ श्रेणीच्या कर्मचाऱ्यांपासून ते वरिष्ठ अधिकाऱ्यांपर्यंत सर्वांचा पाठिंबा असतो. कारण संप यशस्वी झाला, तर सर्वांनाच आर्थिक लाभ मिळणार असतो.**

नवीन पेन्शन योजना अन्यायकारक आहे, असे संपकरी एकमुखाने बोलत आहेत. कर्मचाऱ्यांच्या प्रश्नांचे सरकारला गांभीर्य नाही, असे सांगत आहेत. नोव्हेंबर २००५ नंतर सेवेत दाखल झालेल्या कर्मचाऱ्याला जे निवृत्तिवेतन मिळेल, त्यातून तो विजेचे बिलही भरू शकणार नाही. पंजाब, राजस्थान, छत्तीसगड, हिमाचल प्रदेश, या राज्यांत भाजपचे सरकार नाही, तेथे जुन्या पेन्शन योजनेचे पुनरुज्जीवन करण्यात आले. मग सर्वात पुरोगामी, प्रगत, संपन्न महाराष्ट्रात कर्मचाऱ्यांना जुनी पेन्शन योजना लागू करायला सरकार का कचरते आहे? असे प्रश्न संपकरी विचारत आहेत. आता सरकारी कर्मचाऱ्यांना चांगले पगार आहेत. पण खासगी क्षेत्राप्रमाणे कामाचे कालबद्ध टार्गेट सरकारी क्षेत्रात दिसत नाही. शाळा व रुग्णालये वाढली तशी सरकारी कर्मचाऱ्यांची संख्या वाढली. पगार-भत्ते, प्रशासनावरील खर्च हा १८ टक्क्यांपेक्षा जास्त नसावा, असा आंतरराष्ट्रीय संकेत आहे. प्रशासकीय खर्च वाढणार नाही, याची खासगी क्षेत्रात खबरदारी घेतली जाते. महाराष्ट्र सरकारमध्ये हाच खर्च ६० टक्क्यांच्या पुढे आहे व जुनी पेन्शन योजना लागू केल्यावर तो ८३ टक्क्यांच्या पुढे जाईल. महाराष्ट्रात सरकारी कर्मचाऱ्यांच्या वेतनावर १ लाख ४४ हजार कोटी, निवृत्तिवेतनावर ६७ हजार कोटी खर्च होतात. कर्जावरील व्याज फेडायला आणखी. अर्थसंकल्पातील ८० टक्के रक्कम ही कर्मचाऱ्यांचे वेतन, निवृत्तिवेतन, भत्ते व अन्य प्रशासकीय कामावर खर्च होणार असेल, तर बाकी सर्व कामांना टाळे लावण्याची वेळ येईल. निवृत्तिवेतनासाठी कर्मचारी संघटनांनी जी कठोर भूमिका घेतली आहे, त्यातून महाराष्ट्र वेठीला धरला आहे. सरकारी कर्मचाऱ्यांची कामाची पद्धत, त्यांच्याकडून लोकांना मिळणारी वागणूक, जागेवर नसणे, नंतर या सांगणे, त्यांची नकारात्मक भूमिका यामुळे सामान्य लोक वैतागलेले असतात. शिवाय त्यांना मिळणाऱ्या रजा, बोनस, सुट्ट्या अशा लाभापासून सामान्य जनता वंचित असते. आपण किती शून्य किंवा क्षुल्लक आहोत, हे सरकारी कार्यालयात कामासाठी गेल्यावर अनुभवायला मिळते. पाकिट दिल्यावर काम कसे तत्परतेने होते, याचाही अनुभव येतो. मग संपकऱ्यांविषयी लोकांना सहानुभूती कशी वाटणार? राज्यात दीड कोटी सुशिक्षित बेरोजगार आहेत. तरुणांचे तांडेच्या तांडे रोजगाराच्या शोधात फिरत आहेत. आम्हाला पेन्शन नकोच, पण आम्ही निम्म्या पगारात काम करायला तयार आहोत, अशा घोषणा देत युवकांचे मोर्चे निघत आहेत. कोरोना काळात हेच संपकरी घरी बसून होते, त्यांना पगार मिळत होता. बाकीच्या जनतेची काय तडफड होत होती, हे संपकऱ्यांना ठाऊक नाही का? सहावा-सातवा वेतन आयोगही पाहिजे आणि जुनी पेन्शनही पाहिजे, अशा मागण्या करून प्रशासन ठप्प करण्याने जनता त्रस्त झाली आहे. अन्य किती क्षेत्रात कुठे पेन्शन मिळते, याची माहिती संपकऱ्यांना आहे का? केवळ संघटित बळावर सरकारला झुकवणे व जनतेला वेठीला धरणे हे फार काळ चालू शकणार नाही. वेतन आणि निवृत्तिवेतन यावरील खर्च अव्वाच्या सव्वा वाढत राहिला तर यापुढे सरकारी नोकऱ्या कमी होतील. केवळ कंत्राटी पद्धतीने भरती होईल. नव्या पिढीला सरकारी नोकरीचे दरवाजे आपण बंद करीत आहेत, याचे भान निदान कर्मचारी संघटनांना नाही का?




राज्यातील अठरा लाख सरकारी कर्मचाऱ्यांची एकजूट हीच सरकारला भारी पडणार आहे. 'नो पेन्शन, नो व्होट', अशी घोषणाही संपकाळात ऐकायला मिळाली. संपकरी कर्मचाऱ्यांच्या घरी ३ ते ५ मतदार असू शकतात, संपकऱ्यांनी निर्धार केला तर सत्ताधारी पक्षाला पुढील निवडणुकीत या मोठ्या व्होट बँकेविषयी सावध राहावे लागेल. जुनी पेन्शन योजना ऑक्टोबर २००५ मध्ये बंद झाली तेव्हा राज्यात आघाडीचे सरकार होते. विलासराव देशमुख मुख्यमंत्री व जयंत पाटील अर्थमंत्री होते. जुनी पेन्शन बंद झाल्यावर आघाडी सरकार १० वर्षे म्हणजे २००५ ते २०१४ या काळात सत्तेत होते. तेव्हा कधी संप झाला नाही. ठाकरे सरकार असताना २०१९ ते २०२२ या अडीच वर्षांच्या काळातही जुन्या पेन्शनसाठी आंदोलन झाले नाही. मग सतरा वर्षांनी अचानक कसे आंदोलन होते?

४६ वर्षांपूर्वी वसंतदादा पाटील मुख्यमंत्री असताना राज्य कर्मचाऱ्यांनी संपाचे हत्यार उपसले होते.

केंद्रीय कर्मचाऱ्यांप्रमाणे राज्याच्या कर्मचाऱ्यांना महागाईभत्ता मिळावा, अशी त्यांची मागणी होती. तेव्हा राज्य कर्मचारी महासंघाच्या समन्वय समितीचे नेतृत्व र. ग. कर्णिक करीत होते. दि. ७ डिसेंबर १९७७ रोजी राज्य कर्मचाऱ्यांनी एक दिवसाचा लाक्षणिक संप केला. मुख्यमंत्री वसंतदादा पाटील हे कर्मचाऱ्यांच्या मागण्या मान्य करतील, असा विश्वास सर्वांना होता. पण दादांनी कठोर भूमिका घेतली. 'चामडी गेली तरी चालेल, पण दमडी देणार नाही', असे दादांनी जाहीर केले. त्यावर कर्मचारी संघटनेने म्हटले - 'चामडी गेली तरी चालेल, दमडी घेणारच.' दि. १४ डिसेंबरपासून राज्य कर्मचाऱ्यांनी बेमुदत संप सुरू केला. संपकाळातच दादांनी राज्याचा दौरा केला, शेतकरी, कष्टकरी, सर्वसामान्य जनतेला सरकारी कर्मचाऱ्यांचा संप कसा चुकीचा आहे, हे समजावून सांगितले. तुम्ही दिवस-रात्र राबता, पण किती मिळवता, असा प्रश्न विचारला. राज्यभर संपाच्या विरोधात जनमत तयार होऊ लागले. दुसरीकडे बेरोजगार तरुणांची भरती करून प्रशासन चालू राहील, अशीही त्यांनी व्यवस्था केली. दादांनी संपापुढे मान तुकवली नाही. अखेर ५६ दिवसांनंतर मागणी मान्य झाली नसताना, राज्य कर्मचाऱ्यांवर संप मागे घेण्याची पाळी आली.

**- सुकृत खांडेकर.**

टुडेज् ब्लॉग

# मानव मुक्तीचा सत्याग्रह

**२० मार्च हा दिवस भारताच्या सामाजिक इतिहासाला कलाटणी देणारा दिवस आहे. कारण याच दिवशी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी रायगड जिल्ह्यातील महाड येथील चवदार तळ्यावर अस्पृश्यांना पाणी घेता यावे म्हणून सत्याग्रह केला. हा महाडचा सत्याग्रह, चवदार तळ्याचा सत्याग्रह किंवा मानव मुक्तीचा सत्याग्रह म्हणून ओळखला जातो. म्हणूनच २० मार्च हा दिवस भारतात 'सामाजिक सबलीकरण दिन' म्हणून साजरा केला जातो. हा सत्याग्रह फक्त महाराष्ट्रालाच नाही तर जगाला प्रेरणा देणारा ठरला.**

पाणी ही नैसर्गिक संपत्ती आहे. तिच्यावर सर्वांचा समान हक्क असताना त्या काळच्या जातीय व्यवस्थेने मुख्य स्रोतातून पाणी घेण्यास व रस्त्यावरून जाण्यासही अस्पृश्यांना बंदी घातली. ४ ऑगस्ट १९२३ साली ब्राह्मणेतर पक्षाचे नेते सी. के. बोले यांनी मुंबई कायदे मंडळात एक कायदा पास करून घेतला. त्यानुसार सरकारी खर्चाने बांधलेल्या व सुस्थितीत असलेल्या मालमत्तेवर म्हणजे पाणवठे, धर्मशाळा, बगीचे यावर सर्वांचाच म्हणजे अस्पृश्यांचा देखील अधिकार असेल. जानेवारी १९२४ साली महाडच्या नगरपालिकेने या कायद्याची अंमलबजावणी करण्याचा ठराव केला. या ठरावानुसार नगरपालिकेने महाडचे चवदार तळे अस्पृश्यांसाठी खुले केल्याचे जाहीर केले. परंतु स्पृश्यांनी, अस्पृश्यांना या तळ्यातून पाणी भरू दिले नाही. त्यामुळे अस्पृश्यांमध्ये धाडस आणि आत्मविश्वास निर्माण करू देण्यासाठी व त्यांचा हक्क त्यांना मिळवून देण्यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी चवदार तळ्यातील पाण्यासाठी सत्याग्रह करण्याचे ठरवले.

बाबासाहेबांनी १९ आणि २० मार्च या दिवशी महाडमधील कुलाबा येथे परिषद भरवली. या परिषदेचे अध्यक्ष स्वतः बाबासाहेब हे होते. या परिषदेस सुरेंद्र चिटणीस, संभाजी गायकवाड, अनंत चित्रे, रामचंद्र मोरे, गंगाधरपंत सहस्त्रबुद्धे हे दलितेतर व ब्राह्मण नेते उपस्थित होते. या परिषदेत अस्पृश्यतेचा धिक्कार करून काही ठराव करण्यात आले ते असे. १) स्पृश्यांनी अस्पृश्यांना आपल्या नोकरीत ठेवावे. २) स्पृश्य लोकांनी अस्पृश्य लोकांचे नागरिकत्वाचे अधिकार मान्य करावेत. ३) मृत जनावरे ज्याची त्याने ओढवीत. ४) स्पृश्यांनी अस्पृश्य विद्यार्थ्यांना वार लावून जेवण द्यावे. याच परिषदेत असेही ठरले की सर्वांनी दुसऱ्या दिवशी म्हणजे २० मार्च रोजी महाडच्या चवदार तळ्यातील पाणी प्यावे. त्यानुसार दुसऱ्या दिवशी परिषदेस उपस्थित असणारे सर्व नेते व परिषदेस आलेले सर्व जण चवदार तळ्यावर गेले. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी सर्वप्रथम या तळ्यातील पाणी ओंजळीने प्यायले. त्यावेळी स्त्री-पुरुष ५००० लोक या परिषदेस व त्यानंतर चवदार तळ्यावर पाणी पिण्यासाठी आले. त्यातील पुरुष हे हातात काठी घेऊन आले होते. हातात काठी म्हणजे महार जातीच्या पुरुषाचे चिन्ह होते. चवदार तळ्याचे पाणी पिऊन डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी अस्पृश्यांना मुक्तीचा मार्ग दाखवला. पण, ही मानवतावादी घटना रूढीवादी स्पृश्य हिंदूंना सहन झाली नाही. डॉ. बाबासाहेब आंबेडकर



सरकारी बंगल्यात परत गेल्यावर जातीयवादी, सनातनी विचारांच्या लोकांनी गावात अफवा उठवली की, चवदार तळे बाटवल्यानंतर डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या नेतृत्वाखालील जमाव विश्वेश्वराच्या मंदिरात जाऊन मंदिरही बाटवणार आहेत. धर्म धोक्यात आल्याचे उच्चवर्णीय, सनातनी हिंदूंनी गावभर पसरवले. त्यातून जातीयवादी उच्च हिंदूंचा एक घोळका हत्यारे, लाठ्याकाठ्या घेऊन सभास्थानी आला. त्यांनी सभेनंतर गावाकडे जाण्यापूर्वी जेवण करीत असणाऱ्या अस्पृश्यांना मारहाण केली. त्यांच्या जेवणात माती मिसळली. विश्वेश्वराच्या मंदिरात प्रवेश करण्याचा कट रचला आहे, अशी अफवा उठवल्यामुळे गावातील सनातनी हिंदूंनी सत्याग्रहासाठी आलेल्या लोकांवर हिंसा केली. परंतु अहिंसा हे तत्त्व मानणाऱ्या आंबेडकरांनी अस्पृश्य सत्याग्रहींना सनातनी हिंदूंविरुद्ध हिंसा करू नका असा आदेश दिला होता, त्यामुळे एव्हढी हिंसा होऊनही आणि प्रत्यक्षात स्थानिकांपेक्षा संख्येने जास्त असूनही काठीधारी अस्पृश्यांनी संयम बाळगला. अस्पृश्यांनी तळे बाटवले म्हणून सनातनी, जातीयवादी हिंदूंनी गोमूत्र टाकून ब्राह्मणांकडून तळ्याचे शुद्धीकरण करून घेतले. पुढे महाडच्या नगरपालिकेने स्थानिकांच्या दबावाला बळी पडून अस्पृश्यांना चवदार तळे खुले करण्याचा ठरावही रद्द केला. त्यामुळे बाबासाहेबांनी २५ आणि २६ डिसेंबर रोजी रोजी महाड येथे परिषद घेण्याचे ठरवले. या परिषदेचा उद्देश स्पष्ट करताना डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणाले की, 'आतापर्यंत आम्ही या तळ्याचे पाणी पिऊ शकलो नाही किंबहुना आम्हाला पिऊ दिले नाही, आता आम्ही या तळ्याचे पाणी प्यायलो म्हणजे आमचे सर्व दुःख नष्ट होईल, आमची सर्व परिस्थिती सुधारेल, आमच्यावरील अन्याय कमी होईल असे काही नाही. हा सत्याग्रह म्हणजे केवळ एका मानवाने दुसऱ्या मानवाला समानतेने कसे वागवावे हे सांगण्याचा व सर्व मानवाला समानतेचा अधिकार आहे हे दाखवण्याचा प्रयत्न आहे. समतेची मुहूर्तमेढ रोवण्यासाठी जगाच्या पाठीवर पिण्याच्या पाण्यासाठी केलेला हा एकमेव सत्याग्रह आहे म्हणूनच डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या नेतृत्वाखाली झालेला हा सत्याग्रह 'मानव मुक्तीचा सत्याग्रह' म्हणून ओळखला जातो.

**- श्याम ठाणेदार, पुणे.**

जन्म हा अखेरचा

## कायानुग्रहस्थल - १



कारण ते कित्येक तासच नव्हे तर जिवंत असेपर्यंत किंवा कोणी हलवेपर्यंत त्याच ठिकाणी बसलेले असतात. हे शिवानुभव मंगलभवन निर्माण झाल्यापासून आहे तसेच आहे. ते थोडेसे इकडे तिकडे सरकले काय? नाही. मग आपण या भवनाला योगी म्हणू शकतो? नाही म्हणून शकत. म्हणून एके ठिकाणी स्थिर बसता येत असल्यामुळे कोणी योगी ठरत नाही.

आसनसिद्धीबरोबरच त्याच्या ठिकाणी पावित्र्य असले पाहिजे. शुचि म्हणजे 'पावित्र्य'. शारीरिक, वाचिक आणि मानसिक असे पावित्र्य त्रिविध असते. शरीर, वाणी आणि मन ही तीन साधने आपल्याला परमेश्वराने दिली आहेत. ही तिन्ही साधने पवित्र ठेवायला हवीत.

शरीर शुद्ध कसे ठेवावे? आपल्या आहारामुळे आपले शरीर बनत असते. तुम्ही जसे अन्न सेवन करता तसे तुमचे शरीर बनते. शिवयोग्याचा आहार अत्यंत पवित्र आणि सात्त्विक असतो. म्हणून त्याचे शरीर पवित्र असते. त्याची वाणी शुद्ध असते. तो ज्या साहित्याचा अभ्यास करतो ते पवित्र असते आणि तो वाणीने ज्या शब्दाचा उच्चार करतो ते शब्ददेखील पवित्र असतात. अध्यात्म, परमात्मा, आत्मा, नीती आदी विषयांवर तो निरंतर बोलत असतो. म्हणून त्याची वाणी शुद्ध असते. संतांच्या आणि महापुरुषांच्या वाणीला आपण 'अमृतवाणी' असे म्हणतो. जो वाणी श्रवण केल्यावर आपल्या मनात प्रसन्नता दरवळत राहते आणि आपल्याला अमृतत्त्वाची ओढ लागते, ती अमृतवाणी होय. **(क्रमश:) – काशी जगद्गुरु डॉ. चंद्रशेखर शिवाचार्य महास्वामीजी.**

# जनमानस

## ऑस्कर पुरस्कार आणि आपला समाज

नुकतेच जेव्हा भारताने गीत आणि लघु माहितीपट प्रकारात ऑस्कर पुरस्कार जिंकला तो क्षण भारतीय चित्रपट उद्योगासाठी अभिमानाचा होता. या दोन्ही चित्रपटांच्या विषयातून भारतीय समाजाची झलक दिसून येते. भारतीय सिनेमाकडे स्वतःच्या सामाजिक विषयांचा मोठा साठा आहे. उदाहरणार्थ, 'मदर इंडिया' आणि 'लगान' सारखे पूर्वीचे ऑस्कर-नामांकित चित्रपट जमीनदारी व्यवस्था आणि शेतकरी कर आकारणी केंद्रित होते. तर आताचा 'द एलिफंट व्हिस्पर्स' या चित्रपटात भारतीय समाजाची प्राण्यांच्या संरक्षणाप्रती असलेली चिंता तसेच प्राणी आणि मानव यांच्यातील नैसर्गिक स्नेह दाखवण्यात आला आहे. या पार्श्वभूमीवर समाजातील अर्थपूर्ण विषयांवर चित्रपट केले तर भारतीय चित्रपट ऑस्कर पुरस्कारांच्या यादीत नावाजले जातील, हे निश्चित.

**- प्रा. विजय कोष्टी, जि. सांगली.**

## गड किल्ल्याचे सांस्कृतिक महत्व जपणे जरुरीचे

महाराष्ट्रात अनेक गड - किल्ले आहेत. अशा प्रकारचे गड किल्ले जगात इतरत्र एवढ्या मोठ्या संख्येने नाहीत.



राज्यात ३८७ संरक्षित स्मारके आहेत. आज अनेक गड किल्ल्यावर पर्यटक जातात, तेथे प्लास्टिकचे तुकडे तसेच बाटल्या व पिशव्या टाकतात, मद्यपान करतात. साहजिकच अशा किल्ल्यांवर कचरा साठतो. अशा कृत्यापासून लोकांना परावृत्त करावयस पाहिजे. आता सरकारने यावर कठोर उपाययोजना करण्याचे ठरविले आहे.


गडकिल्ल्यावर मद्यपान केल्यास त्यास तीन महिने कारावास तसेच किमान दहा हजार रुपये दंड आकारण्याचे प्रस्तावित असल्याचे राज्याचे सांस्कृतिकमंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी नुकतेच विधान सभेत सांगितले आहे. त्यासाठी हेरिटेज मार्शल नेमण्याचे सुद्धा प्रस्तावित आहे. राज्यातले गड किल्ल्याचे संरक्षण जतन तसेच संवर्धनाचा मुद्दा विधान सभेत उपस्थित करण्यात आला होता. सरकारने गडकिल्ल्याच्या संरक्षण व संवर्धन यासाठी उचललेले पाऊल स्तुत्य आहे.

**- शांताराम वाघ, पुणे.**

# समलिंगी विवाह ही पाश्चिमात्य बुद्धिमत्ता

**समलिंगी विवाह ही पाश्चिमात्य पद्धत आहे किंवा राहू शकते. परंतु भारतीय संस्कृतीत किंवा भारत भूमीत त्याला मुळातच स्थान नाही आणि नसावे.कारण समलिंगी विवाह भारतीय कुटुंब व्यवस्थेच्या पूर्णपणे विरोधात आहे. त्यामुळे समलिंगी विवाहांना कायदेशीर मान्यता नकोच सोबतच देशातील जनतेचा सर्वच स्तरातून विरोध व्हायला हवा. कारण समलिंगी विवाह ही भारतीय परंपरा नाहीच. समलिंगी विवाहाला मान्यता मिळावी यासाठी दाखल करण्यात आलेल्या याचिकेवर सुनावणीच्या दरम्यान केंद्र सरकारने ५६ पानी प्रतिज्ञापत्र दाखल केले आहेत. या ५६ पानांमध्ये हेच दर्शविले आहे की, समलिंगी विवाह भारतीय संस्कृतीत किंवा परंपरेत बसत नाही. त्याचप्रमाणे पती-पत्नी या संकल्पनेशी आणि त्यांना जन्माला आलेली मुले यांच्याशी ते जुळत नाही.**

भारतात बालविवाह प्रथा होती. त्यावर सुद्धा कायद्याची बंदी आहे. ज्या-ज्या प्रथा नुकसानदायी आहे. त्यावर भारतीय कायद्यानुसार बंदी आहे. परंतु समलिंगी विवाह पद्धत ही पाश्चिमात्य पद्धती आहे. त्यामुळे समलिंगी विवाहांना भारतात कायदेशीर मान्यता नकोच सोबतच सामाजिक मान्यता सुध्दा नको. देशात जातीय विवाह, आंतरजातीय विवाह, आंतरधर्मीय विवाह, आंतरदेशीय विवाह ही बाब सर्वांनाच मान्य आहे व कायद्याला सुध्दा मान्य आहे. परंतु देशातील ९९.९ टक्के लोकांना समलिंगी विवाह ही पद्धत मान्य नाही आणि राहणार पण नाही. फक्त बोटावर मोजण्या इतक्याच लोकांना मान्य आहे. कारण ही पद्धत पाश्चिमात्य पद्धत आहे. त्यामुळे कोणत्याही संस्कृतीत किंवा रीतीरिवाजात बसत नाही. कारण पती-पत्नीच्या व्याख्येचा विचार केला तर आपण जगाच्या पाठीवर कुठेही जा. ते सर्वच आपला सन्मान करतील व संबंध समजतील. परंतु समलिंगी विवाहांचा विचार केला तर जगात त्याला वेगळ्या नजरेने लोक पहातील व कुठेही स्थान मिळणार नाही. त्यामुळे समलिंगी विवाहांना भारतातच नाही तर जगात कुठेही कायदेशीर स्थान नसावे असे



मला वाटते. कारण पती-पत्नीमध्ये विवाद झाला तर पुनर्विवाह करता येते. परंतु समलिंगी विवाहांमध्ये जर दोघांचा विवाद झाला तर दुसरा समलिंगी विवाह कसा काय होणार? आणि कोण करणार? त्यामुळे समलिंगी विवाहांना कृत्रिम बुद्धिमत्ताच म्हणावी लागेल. अशा अनेक समस्या समलिंगी विवाहांमध्ये आहेत. त्यामुळे समलिंगी विवाहांना कायदेशीररीत्या कुठेही स्थान नसावे. पूर्वी समलिंगी विवाह हा अपराध मानला जात होता. परंतु आता भारतात समलिंगी विवाह हा अपराध मानला जात नाही. कारण सुप्रीम कोर्टाने कलम ३७७ रद्द करून समलैंगिकता हा गुन्हा नाही, असा ऐतिहासिक निर्णय दिला होता. मात्र, देशात समलिंगी विवाहांना कायदेशीर मान्यता देण्यात आलेली नाही. कारण देशात सामाजिकदृष्ट्या या पद्धतीला कुठेही स्थान नाही.

भारतात पाश्चिमात्य पद्धतीचा अवलंब करून अनेक समलिंगी लोक जाहीरपणे लग्न करताना दिसत आहेत हे योग्य नाही. परंतु भारतात समलिंगी विवाहांना कायदेशीर मान्यता नाहीच. मुख्यत्वेकरून समलिंगी पद्धत ही जीवसृष्टी विरुद्ध आहे. मानव हा बुद्धिजीवी प्राणी आहे. त्यामुळे समलिंगी विचार ठेवणाऱ्यांनी विचार करायला हवा की मनुष्य प्राणी असो वा पशु-पक्षी यांच्यात विषमता असल्यामुळेच आपल्याला मानव, पशु-पक्षी यांची उत्पत्ती दिसून येते. त्यामुळे समलैंगिकता सृष्टीच्या कोणत्याही नियमात बसत नाही. समलिंगी विवाहांना कायदेशीर मान्यता देण्याची मागणी करणाऱ्या याचिका आता सर्वोच्च न्यायालयाने पाच न्यायाधीशांच्या घटनापीठाकडे पाठविण्यात आली आहेत. या प्रकरणाची सुनावणी १८ एप्रिलला होणार आहे. त्यामुळे हा मुद्दा कायद्याच्या पटलावर आहे. माझ्या मते समलिंगी विवाह हा कायद्याच्या दृष्टिकोनातून भारतीय संस्कृतीत अजिबात बसत नाही. समलिंगी विवाह ही प्रथा भारतीय कुटुंबपद्धतीपासून कोसो दूर आहे. त्यामुळे केंद्र सरकारने समलिंगी विवाहास केलेला विरोध स्वागतार्ह आहे याचे मी समर्थन करतो.

**- रमेश लांजेवार, नागपूर.**

सुराज्य सोलापूर हे दैनिक मुद्रक, प्रकाशक राकेश हरिपंत टोळ्ये यांनी सह्याद्री पब्लिशर्स, १५७/१५८, औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून तेथे आणि ६०६/७/८, नारायण पेठ, पुणे-३० येथून एकाचवेळी प्रकाशित केले. सोलापूर मुख्य कार्यालय - फोन-०२१७-२६०७२०१, फॅक्स-०२१७-२६०७२०२, पुणे शहर कार्यालय - फोन/फॅक्स - ०२०-२४४६४७५५. I R. N. I. NO. MAHMAR / २००२/९७०७/२००३ I Email - dailysuraajya@gmail. com संस्थापक - स्व. राजेश विष्णूपंत कोठे, संपादक - राकेश टोळ्ये.

# सरकारी कर्मचाऱ्यांची रक्तदान करून गांधीगिरी; आज थाळी नाद आणि जोडेमार आंदोलन




सुराज्य/सोलापूर

एकच मिशन जुनी पेन्शनचा नारा देत राज्य सरकारी कर्मचारी मध्यवर्ती संघटना व शासकीय, निमशासकीय कर्मचारी संघटना समन्वय समिती तसेच शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी संघटना कृती समितीच्या नेतृत्वाखाली विविध कर्मचारी संघटनांनी गेल्या मंगळवारपासून सुरू असलेल्या बेमुदत संपाच्या सहाव्या दिवशी गांधीगिरी करत रक्तदान शिबिर घेऊन सामाजिक बांधिलकी जोपासली यामध्ये १०३ जणांनी रक्तदान करत शासनाच्या धोरणाचा निषेध केला

शासकीय निमशासकीय कर्मचारी संघटना समन्वय समिती व राज्य सरकारी मध्यवर्ती कर्मचारी संघटना सोलापूरच्या वतीने जुनी पेन्शन योजना लागू करावी या मुख्य मागणीचा अन्य प्रलंबित मागण्यासाठी १४ मार्च पासून बेमुदत संप सुरू आहे. या बेमुदत संपाच्या काळामध्ये आंदोलनाचे अनेक टप्पे संघटनेच्या वतीने हाती घेण्यात आली आहेत. शनिवारी कर्मचाऱ्यांचा विराट मोर्चा झाला. तर रविवार सामाजिक बांधिलकी जोपासत कर्मचाऱ्यांना रक्तदान शिबिराचे आयोजन केले होते. मध्यवर्ती संघटनेचे अध्यक्ष श्री विरुपक्ष घेरडे यांनी स्वतः रक्तदान करून या रक्तदान शिबिराचे उद्घाटन केले. या शिबिरात १०३ रक्तदात्यांनी सहभाग नोंदवला. सर्व रक्तदात्यांचे संघटनेच्या वतीने शंतनू गायकवाड, अशोक इंदापूरे विवेक लिंगराज अमृत कोकाटे दिनेश बनसोडे राम शिंदे यांचे हस्ते पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला.

या शिबिरास सिव्हिल हॉस्पिटल रक्तपेढी, श्री इरपण्णा बोल्ली रक्तपेढी यांचे सहकार्य लाभले. या रक्तदान शिबिरास कामगार नेते कॉ. नरसय्या आडम मास्तर यांनी भेट देऊन कार्यकर्त्यांचा उत्साह वाढवला व सर्व रक्तदात्यांचे अभिनंदन केले. हे शिबिर यशस्वी करण्यासाठी राजीव साळुंखे अमर भिंगे रविराज नष्टे लक्ष्मीकांत आयगोळे राम फलपले शंकर जाधव नितीन कसबे पंकज जाधव आशिष कुलकर्णी यांनी विशेष परिश्रम केले. संघटनेच्या वतीने थाळी नाद आंदोलन करण्यात येणार आहे

### आज जोडो मार आंदोलन

शिंदे गटाचे (शिवसेनेचे) आमदार संजय गायकवाड यांनी कर्मचाऱ्यांच्या संपा बाबत आवमान कारक भाष्य केल्यामुळे यांचा निषेध केला जाणार आहे. यावेळी आ. गायकवाड यांच्या पुतळ्यास जोडोमार आंदोलन केले जाणार असल्याचे सांगण्यात आले.

# महापालिकेच्या खुल्या जागेतील प्रकरणावरून खरादी - काळजे यांच्यात आरोप प्रत्यारोप



सुराज्य/सोलापूर

बेगम पेठ पोलीस चौकी येथील महापालिकेच्या जागेवर अतिक्रमण केल्याच्या कारणावरून एमआयएमचे माजी गटनेते रियाज खरादी आणि शिवसेनेचे जिल्हाप्रमुख मनीष काळजे यांच्यामध्ये आरोप प्रत्यारोप होताना दिसत आहे. या कारणावरून शिवसेनेचे जिल्हाप्रमुख काळजे यांनी रियाज खरादी यांचा बंदोबस्त करू असे सांगितले होते त्याला उत्तर म्हणून पुन्हा खरादी यांनी आम्ही कोणाला घाबरत नाही काय करायचे करा असे उत्तर दिले आहे. यावर काळजे यांनी रियाज खरादी हे मनोरुग्ण आहेत आरोग्य खाते आमच्याकडे आहे, त्यांचा तिकडे बंदोबस्त करूच असे ठणकावून सांगितले आहे.

बेगम पेठ येथील महापालिकेच्या कोण्या जागेत एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेच्या वतीने पाणपोई सुरू करण्यात आली आहे यासंबंधी तेथे याची डिजिटल लावण्यात आले आह. डिजिटल लावल्याची माहिती मिळतात महापालिकेचे पथक ते काढण्यासाठी बेगमपेठ येथे गेले होते मात्र डिजिटल मुख्यमंत्र्यांचा फोटो असल्यामुळे ते रिकाम्या हातानेच परत आले या प्रकरणावरून रियाज खरादी यांनी क्लिकेच्या जागेत अतिक्रमण होत आहे प्रशासन याची गांभीर्याने दखल घेत नाही आयुक्ताने याबाबत लक्ष घालावे, अशी मागणी केली होती. याला प्रत्युत्तर म्हणून शिवसेनेचे जिल्हाप्रमुख मनीष काळजे यांनी गोरगरीब नागरिकांसाठी ही पाणपोई सुरू करण्यात आली आहे येथे कोणतेही अतिक्रमण करण्यात आलेले नाही. याउलट खरादी यांनीच येथे वडापावची गाडी टाकून अतिक्रमण केलेले आहे. असा आरोप करत खराबी यांच्यावर एक- दोन गुन्हे दाखल आहेत ते मनोरुग्ण आहेत. आमच्याकडे आरोग्य खाते आहे त्यांचा आम्ही तिकडे बंदोबस्त करू असे म्हटले आह. यावर खरादी यांनी एकनाथ शिंदे गटाच्या वतीने येथे डिजिटल लावून ही जागा हडपण्याचा प्रकार असल्याचा आरोप केला आहे. आम्ही कोणतेही दोन नंबर धंदे करत नाही, आमचा बंदोबस्त कोणीही करू शकत नाही, कोणाला काय करायचे ते करू द्या असे सांगत आपण याबाबत शिवसेनेच्या वरिष्ठ नेत्यांची बोलून हा सर्व प्रकार कानावर घातला असल्याचे सांगितले आह. महापालिकेचा रस्ता असून आपण याप्रकरणी कायदेशीर लढाई लढणार आहोत आपण या प्रकरणांमध्ये कोणाचेही नाव घेतले नसल्याचेही यावेळी खरादी यांनी सांगितले.



## बदलत्या जीवनशैलीमुळे वाढतोय 'फॅटीलिव्हर'चा धोका : डॉ.संघानी

सोलापूर : केवळ दारूमुळे यकृतातील चरबीचे प्रमाण वाढते असा पूर्वी समज होता. परंतु बदलत्या जीवनशैलीमुळेही यकृतातील चरबीचे प्रमाण वाढत आहे. यातून ' फॅटीलिव्हर' चा धोका वाढत आहे, असे प्रतिपादन रेडिओलॉजिस्ट असोसिएशनचे राष्ट्रीय अध्यक्ष डॉ. शैलेश संघानी (मुंबई) यांनी केले. सोलापूरातील पहिले रेडिओलॉजिस्ट डॉ. एन. जी. देशमुख यांच्या स्मरणार्थ अश्विनी ग्रामीण वैद्यकिय महाविद्यालय रेडिओलॉजी विभाग आणि सोलापूर रेडिओलॉजिस्ट असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने रविवारी अश्विनी वैद्यकिय महाविद्यालयात कार्यशाळा झाली. 'यकृत, पित्ताशय आणि स्वादुपिंड यांच्या आजाराची निदान प्रणाली' असा या कार्यशाळेचा विषय होता. कार्यशाळेचे उद्घाटन डॉ. संघांनी यांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून झाले. यावेळी व्यासपीठावर डॉ. प्रदीप गांधी, डॉ. संदीप कवठाळे, डॉ. बाळकृष्ण कित्तुरे, अश्विनी ग्रामीण वैद्यकिय महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉ. सुहास कुलकर्णी, सोलापूर रेडिओलॉजिस्ट असोसिएशनच्या अध्यक्षा डॉ. ज्योती तापडिया - तावरे उपस्थित होते.याप्रसंगी डॉ. डी. एस. कुलकर्णी, डॉ. सुरेश कवठेकर, डॉ. सुरेश बाकळे, डॉ. विवेक चौधरी, डॉ. राजेश फडकुले, कृपावती देशमुख यांची प्रमुख उपस्थिती होती.यावेळी सोलापूर रेडिओलॉजिस्ट असोसिएशनच्या उपाध्यक्षा डॉ. सीना कासेगावकर, सहसचिव डॉ. पूनम देशमुख, खजिनदार डॉ. नसीम कोल्हारकर, सहसचिव डॉ. मयुरी दोशी उपस्थित होते. अध्यक्षा डॉ. ज्योती तापडिया - तावरे यांनी प्रास्ताविक केले. सचिवा डॉ. अंशू शर्मा यांनी सूत्रसंचालन तर डॉ. प्रदीप देशमुख यांनी आभार प्रदर्शन केले.

## लोखंडवाला कॉम्प्लेक्समधील घरातील आटा चक्कीला आग

सोलापूर : बेगमपेठ येथील लोखंडवाला कॉम्प्लेक्समधील पाचव्या मजल्यावर राहणाऱ्या रहिवाशांच्या घरातील आटा चक्कीला शनिवारी रात्री आग लागली.याची माहिती मिळताच अग्निशमन दलाचे जवान हे घटनास्थळी दाखल झाले. दरम्यान, त्यांनी घटनास्थळी जाऊन पाहणी करीत आग लगेच विझवली.ही आग शॉर्टसर्किटमुळे लागल्याची प्राथमिक माहिती अग्निशमन दलाचे केदार अवटे यांनी दिली.यात कोणतीही जीवितहानी झाली नाही.

## हॅण्डल लॉक असलेली दुचाकी घरासमोरुन केली लंपास

सोलापूर : घरासमोर हॅण्डल लॉक करून ठेवलेली दुचाकी क्रमांक एम.एम.१३.डी.एच.६८३४ ही अज्ञात चोरट्याने दि.१७ मार्च रोजी दुपारी एक ते सव्वा दोन वाजण्याच्या दरम्यान भानाऋषी हॉस्पिटल फुलरी अपार्टमेंट न्यू पाच्छा पेठ येथे घडली.याप्रकरणी विजय आप्पाराव सालवे (वय-५५,रा.भानाऋषी हॉस्पिटल,फुलरी अपार्टमेंट) यांनी जेलरोड पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे. त्यांच्या फिर्यादीवरून अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे.घटनेचा पुढील तपास सहायक फौजदार अवचारे हे करीत आहेत.

# हिंदू अजेंडा आणि पक्षसंघटन मजबूत करण्यासाठी भाजप प्रवेश : पाटील

- चारशे समर्थक आज वंदे भारतने होणार मुंबईला रवाना
- प्रदेश कार्यालयात दोन वाजता रंगणार प्रवेश सोहळा

सुराज्य/सोलापूर

लिंगायत समाजाचे युवा नेते, युवक काँग्रेसचे माजी जिल्हाध्यक्ष उदय पाटील यांचा आज दुपारी दोन वाजता भाजपच्या प्रदेश कार्यालयात जाहीर प्रवेशाचा कार्याक्रम होणार आहे. उपमुख्यमंत्री देऊन देवेंद्र फडणवीस आणि प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांच्या उपस्थितीत भाजपमध्ये प्रवेश होणार आहे. याप्रवेशासाठी पाटील समर्थक तब्बल चारशे समर्थक वंदेभारत एक्सप्रेसने रवान झाले आहे.

कोणती ही अट आपण प्रवेशासाठी ठेवली नाही हिंदू अजेंडा आणि पक्षसंघटन मजबुत करण्यासाठी आपण भाजप पक्ष निवडला असल्याचे पाटील यांनी दैनिक सुराज्यशी बोलताना सांगितले

भाजप महाविजय २०२४ चे प्रदेश संयोजक श्रीकांत भारतीय यांनी १४ फेब्रुवारी पाटील यांच्या निवासस्थानी भेट दिली होती. त्याचवेळी पाटील यांचा भाजपप्रवेश निश्चित झाल्याचे मानले जात होते. पाटील यांच्या भाजप प्रवेशामुळे पक्षाची ताकद निश्चितपणे वाढणार आहे.कारण २००३ मध्ये उदय पाटील यांनी शहर व जिल्ह्यात आर. पी. ग्रुपच्या जवळपास ५०० शाखा स्थापन करून युवकांची मोठी फळी उभी केली आहे. दादाश्री प्रतिष्ठानच्या माध्यमातून धार्मिक आणि सामाजिक कार्याला सुरुवात केली. सर्व जिल्ह्यात त्यांचे विविध क्षेत्रातील मान्यवरांसोबत असलेले संबंध पाहता पक्षाला त्यांचा निश्चितपणे फायदा भाजपला होणार आहे.

### फक्त हिंदू अजेंडा

आज आपला भाजप प्रवेश होणार आहे. प्रवेश करतना डोळ्यासमोर कोणताही अजेंडा ठेवला नाही. कोणतीही अट ठेवली नाही पक्ष जो जबाबदारी देईल तो आपण पाळणार आहे. पक्ष संघटन वाढवणे आणि हिंदूत्वासाठी आपण भाजपाला प्रधान्य दिले आहे.

–उदय पाटील (युवा नेते)



## सरकोली येथे विष पिऊन आत्महत्या

सोलापूर : सरकोली (ता.पंढरपूर) येथे राहणाऱ्या समाधान सुभाष भुई (वय ३५) याने विष पिऊन आत्महत्या केली . शुक्रवारी सकाळच्या सुमारास त्याने राहत्या घरात विष प्राशन केले होते. त्याला पंढरपूर येथे प्राथमिक उपचार करून प्रभाकर (भाऊ) यांनी सोलापुरातील शासकिय रुग्णालयात दाखल केले होते. उपचारादरम्यान तो रविवारी सकाळी मयत झाला .तालुका पोलिसात याची नोंद झाली असून या मागचे कारण समजले नाही.

### तिसंगी येथे दांडक्याने मारहाण

तिसंगी (ता.पंढरपूर) येथील ग्रामपंचायत कार्यालयाजवळ पूर्वीच्या भांडणावरून लाकडी दांडका आणि लाथाबुक्क्याने केलेल्या मारहाणीत समाधान चांगदेव मस्के (वय३५) हा जखमी झाला . ही घटना शनिवारी दुपारच्या सुमारास घडली . त्याला पंढरपूर येथे प्राथमिक उपचार करून सोलापुरातील शासकिय रुग्णालयात दाखल करण्यात आले . संतोष मस्के, बबलू मस्के आणि इतर तीन जणांनी मारहाण केली.

### अपघातामधील जखमीचा मृत्यू

हलसंगी (ता.दक्षिण सोलापूर) येथील वीरेश धाब्याजवळ ट्रकला पाठीमागून धडकून जखमी झालेला मल्लिकार्जुन श्रीकांत पाटील (वय २८ रा. टाकळी ता. दक्षिण सोलापूर) हे सोलापुरातील शासकिय रुग्णालयात उपचार घेताना रविवारी पहाटे मयत झाले. २ मार्च रोजी सायंकाळच्या सुमारास ते दुचाकीवरून हालसंगी ते धुळखेड असा प्रवास करीत होते. हलसंगी जवळ समोरचा ट्रक अचानक थांबला. त्यावेळी पाठीमागून दुचाकी धडकली होती. अशी नोंद तालुका पोलिसात झाली आहे.




वसुंधरा महाविद्यालयात नवीन शैक्षणिक धोरण व निपुण भारतवर राष्ट्रीय कार्यशाळा

## भारतीय ज्ञानपरंपरा जगासमोर मांडण्यासाठी नवीन शैक्षणिक धोरण : डॉ. बेद्रे

सुराज्य/सोलापूर

वसाहतवादी शिक्षण व्यवस्थेमधून भारतीय शिक्षणाची सुटका करण्यासाठी भारतीय प्रणालीचे नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाची आखणी केलेली आहे. विशेषत: संपन्न ज्ञानपरंपरा जगासमोर मांडण्यासाठी नवीन शैक्षणिक धोरणाच्या माध्यमातून प्रयत्न करण्यात आलेला आहे.

नालंदा, तक्षशिला, वल्लभी व विक्रमशीलासारख्या जगविख्यात विद्यापीठांचा वारसा भारतीयांना आहे. त्यासाठी भारतीय भाषांना प्राधान्य दिले आहे, असे प्रतिपादन वसुंधरा कला महाविद्यालय आयोजित नवीन शैक्षणिक धोरण व निपुण भारत या विषयावरील राष्ट्रीय कार्यशाळेत डॉ. हरिसिंग गौर सागर विद्यापीठातील यूजीसी. आर.डी.सी.चे संचालक प्रा. डॉ. आर. टी. बेद्रे यांनी केले.

यावेळी कार्यशाळेचे उद्घाटक माजी मंत्री प्रा. लक्ष्मण ढोबळे यांनी नवीन शैक्षणिक धोरण व निपुण भारत इत्यादी गोष्टी यशस्वी करण्यासाठी संस्था चालकांची ही भूमिका महत्त्वाची आहे असे मत उद्घाटनप्रसंगी व्यक्त केले.

यावेळी प्राचार्य डॉ मीना गायकवाड यांनी माणसाचा तंत्रज्ञानाचा अतिरेकी वापर म्हणजेच माणसावरील सैतानाचा विजय अशी अवस्था होईल, म्हणून धोरणात शिक्षकांची भूमिका मोलाची आहे असे मत मांडले. तिसऱ्या सत्रामध्ये शिवराज ढाले यांनी निपुण भारत् राष्ट्रीय चळवळ आहे. त्यामध्ये नावीन्यता, बदल स्वीकारण्यासाठी प्रत्येकाने प्रयत्न करणे आवश्यक असल्याची भूमिका मांडली. आम्ही किती कष्ट केले समारोपाच्या कार्यक्रमात प्रसंगी प्रा. डॉ. दत्ता वाघमारे, किशोर जाधव यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी उपस्थित वक्त्यांनी निपुण भारत हे मिशन फक्त शासकिय पातळीवर राबवले जात असून खाजगी क्षेत्रात निपुण भारत वर कार्यशाळा आयोजित करणारे हे पहिले महाविद्यालय आहे .असे मत व्यक्त केले.

## राळेरास येथे अडीच एकर द्राक्ष बाग भुईसपाट

सुराज्य/बार्शी

वादळी वारे व अवकाळी पाऊस शेतकऱ्यांचा हातातोंडाशी आलेला घास हिरावत आहे. मोठया कष्टाने वर्षभर जपलेल्या द्राक्षबागांना सर्वाधिक फटका बसत आहे. बार्शी तालुक्यातील राळेरास येथे शनिवारी पहाटेच्या वादळी वारे व पावसात अडीच एकर द्राक्षबाग भुईसपाट झाल्याने संबंधित शेतकऱ्याचे लाखो रूपयांचे नुकसान झाले.

याचबरोबर राळेरास, धामणगांव, हिंगणी येथे इतरही शेतकऱ्यांच्या द्राक्षाच्या घडांचे मणी गारा व वादळी पावसाने गळाले. सध्या ज्वारी, हरभरा, गहू, कांदा या आदी रब्बी पिकांची काढणी मळणीची कामे सुरू आहेत. त्यामुळे या पिकांचेही मोठया प्रमाणात नुकसान होत आहे.

मागील दोन तीन दिवसांपासून तालुक्यात अवकाळीचे ढग घोंगावत आहेत. गुरूवारी सायंकाळी बार्शी शहर व परिसरात अवकाळी पाऊस झाला. शुक्रवारी सायंकाळीही बोरगांव व परिसरात पाऊस झाला. शनिवारी पहाटे दोनच्या सुमारास राळेरास, धामणगांव, हिंगणी या द्राक्षपट्टयात वादळी वाऱ्यासह गारांचा पाऊस झाला. राळेरास येथे भाऊसाहेब तानाजी पंके या शेतकऱ्याची काढणीस आलेली अडीच एकर द्राक्षबाग भुईसपाट झाली. तसेच सोमनाथ महादेव पंके, धनंजय संभाजी पंके या शेतकऱ्यांचेही नुकसान झाल्याचे सांगण्यात आले. धामणगांव, हिंगणी येथे वादळी वारे व पावसाने द्राक्ष घडातील मण्यांची मोठया प्रमाणात गळ होवून नुकसान झाले.

शनिवारी सायंकाळच्या सुमारास काटेगांव, पांगरी, पांढरी आदी भागात वाऱ्यासह पाऊस झाला. यामुळे शेतात काढून पडलेल्या ज्वारी, हरभरा, गहू आदी पिकांचे नुकसान झाले. पावसाने ज्वारी काळसर पडण्याची भीती व्यक्त होत आहे. अवकाळी पावसाने बागायतदार शेतकऱ्यांसह कोरडवाहू शेतकऱ्यांचे नुकसान होत आहे. राळेरास येथे तहसीलदार सुनिल शेरखाने यांनी स्वत: भेट देवून द्राक्षबागेच्या नुकसानीची पाहणी करून् पंचनामा केला.

## भावकीतील शेताचा वाद; कोळेगाव येथे कुऱ्हाडीने मारहाण

सोलापूर : भाऊकीतील शेतातल्या वाटेच्या वादातून कुऱ्हाड आणि काठीने केलेल्या मारहाणी तरुण जखमी झाला. ही घटना कोळेगाव (ता.मोहोळ) येथे रविवारी सकाळच्या सुमारास घडली.

अक्षय प्रल्हाद मदने (वय २४ रा. कोळेगाव) असे जखमी झालेल्या तरुणाचे नाव आहे.

त्याला मोहोळ येथे प्राथमिक उपचार करून सोलापुरातील शासकिय रुग्णालयात दादा मदन (भाऊ) यांनी दाखल केले. जखमी हा रविवारी सकाळी घरा जवळ थांबला होता. त्यावेळी नवनाथ मारुती मदने आणि राजू प्रभू मदने (रा. कोळेगाव) यांनी त्याला कुऱ्हाड आणि काठीने मारहाण केली, अशी नोंद तालुका पोलिसात झाली आहे.

महापारेषण
महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी मर्यादित

भाडेतत्वावर वाहन मिळणे बाबत

अउदा पॅक विभाग-३, सोलापूर येथे भाडेतत्वावर टाटा सुमो/महिंद्रा बोलेरो प्लस किंवा तत्सम वाहनाची आवश्यकता असून आमची कार्यालयीन चौकशी क्र. ०१५५ दि. १७/०३/२०२३ असून इच्छुकांनी त्यांचे कोटेशन सिलबंद लिफाफयात दि. २८/०३/२०२३ संध्याकाळी ०५.३० वाजेपर्यंत सादर करावे. वरील निविदे बाबतची संपूर्ण माहिती www.mahatransco.in या संकेत स्थळावर उपलब्ध आहे.

दूरध्वनी क्र. ७४४७४४०८५४.

सही/-
कार्यकारी अभियंता
पॅक विभाग-३, सोलापूर

# गुन्हे सिद्ध करण्यात मंद्रुप पोलीस ठाणे जिल्ह्यात अव्वल

सुराज्य/दक्षिण सोलापूर

सोलापूर जिल्ह्यातील महाराष्ट्र - कर्नाटक सीमावर्ती भागातील सोलापूर -बंगळुरू रोड वरील महत्वाचे पोलीस स्टेशन असल्याने ह्या भागात विविध प्रकारचे गुन्हे घडत असतात. पोलीस ठाण्याच्या हद्दीतील विविध गुन्ह्यांमध्ये न्यायालयात चालू असलेल्या खटल्यात नियोजनबद्ध कामकाजामुळे फेब्रुवारी २०२३ मध्ये न्यायालयासमोर खटले चालवले. निकाली निघालेल्या खटल्यामध्ये ९७ टक्के गुन्ह्यांमध्ये शिक्षा झाली. त्यामुळे न्यायालयात बोर्डावर आलेल्या केसेसमध्ये शिक्षा किंवा दंड लागण्याच्या प्रमाणात (गुन्हे शाबिती) जिल्ह्यात मंद्रूप पोलीस ठाणे अव्वल ठरले आहे.

सोलापूर जिल्ह्यामध्ये २५ पोलीस ठाणे आहेत. यापैकी मंद्रूप पोलीस ठाण्याच्या हद्दीतील देखील सुमारे ३७ प्रकरणे न्यायालयात होते. यामध्ये शिरीषकुमार देशपांडे, (पोलीस अधीक्षक सोलापूर ग्रामीण), हिंमत जाधव, (अप्पर पोलीस अधीक्षक सोलापूर ग्रामीण), अमोल भारती (उपविभागीय पोलीस अधिकारी) यांच्या मार्गदर्शनाखाली मंद्रूप पोलीस ठाण्याचे प्रभारी अधिकारी सहा. पोलीस निरीक्षक रवींद्र मांजरे यांच्या नेतृत्वात कोर्ट पैरवी अधिकारी ग्रेड पीएसआय विजयकुमार जाधव, म.पो.शि. कांबळे यांनी समसूचकता व कार्यतत्परता दाखवून वेगवेगळी प्रकरणे चांगल्या प्रकारे हाताळून न्यायालयात नियोजनबद्ध मांडणी केल्यामुळे ३७ खटल्यांचा निकाल लागून त्यापैकी ३६ खटल्यांमध्ये आरोपींना शिक्षा लागली आहे.

मंद्रूप पोलीस ठाण्याच्या हद्दीमध्ये सहायक पोलीस निरीक्षक रवींद्र मांजरे यांनी पदभार स्वीकारल्यानंतर आपल्या कामाचा ठसा कृतीतून उमटवत वेगवेगळ्या उपक्रमाबरोबरच न्यायालयात देखील त्यांच्या नेतृत्वात कौशल्याचा ठसा उमटवला आहे. मंद्रूप पोलीस ठाण्याला वृक्षारोपणाच्या माध्यमातून ग्रीन पोलीस ठाणे बनविण्याबरोबरच वेगवेगळे उत्सव, यात्रा या निमित्याने बैठका घेऊन मार्गदर्शन करत असतात.

मंद्रुप पोलीस ठाण्याचे हद्दीमध्ये कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्याचा प्रयत्न करण्यात देखील ते यशस्वी ठरले आहेत. तत्कालीन पोलीस अधीक्षक तेजस्वी सातपुते तसेच सध्याचे पोलीस अधीक्षक शिरीषकुमार सरदेशपांडे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस ठाण्याच्या हद्दीमध्ये ऑपरेशन परिवर्तन अंतर्गत हातभट्टी दारू वाहतूक व विक्री यावर नियंत्रण मिळवले आहे.

### अचूक नियोजन अन् तत्परतेमुळे यश



मंद्रूप पोलीस ठाण्याच्या हद्दीमध्ये गत फेब्रुवारी महिन्यामध्ये ३७ प्रकरणे न्यायालयात दाखल होते. अचूक नियोजन व तत्परता दाखवून आम्ही सर्व कागदपत्रे आणि पुरावे दाखल केले. मंद्रुप पोलिसांच्या दर्जेदार तपास व उत्कृष्ठ कोर्ट पैरवी कामकाजामुळे सर्व पुरावे ग्राह्य धरून तब्बल ३६ गुन्ह्यांतील आरोपींना शिक्षा लागली आहे. सन २०२२ मध्ये शिक्षा लागण्याच्या प्रमाणात मंद्रुप पोलीस स्टेशन जिल्ह्यात प्रथम क्रमांकावर होते. पोलीस स्टेशन हद्दीत कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी प्राधान्य असून मंद्रुप पोलीस स्टेशनचे अधिकारी अंमलदार यांचेसह पोलीस पाटील व ग्रामरक्षक दलाच्या माध्यमातून प्रयत्नशील आहेत. रेकॉर्डवरील पाहिजे असलेले आरोपी पकडून विविध गुन्ह्यांतील आरोपींवर तडीपारीसारख्या कडक प्रतिबंधक कारवाई करण्यामध्येही वरिष्ठांच्या मार्गदर्शनात अव्वल राहण्याचे प्रयत्न चालू आहेत.

–रवींद्र मांजरे (सहा. पोलीस निरीक्षक, मंद्रूप पोलीस स्टेशन)

महावितरण
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित

'ई निविदा सुचना'

मान्यताप्राप्त अनुभवी कंत्राटदारांकडून निवीदा प्रक्रिया मार्फत पंढरपुर विभागांतर्गत एमपॅनेलमेंट योजने अंतर्गत उच्चदाब व लघुदाब वीज वाहिन्या तसेच वीज वितरण रोहित्रांची देखभाल व दुरुस्ती करण्याच्या कामासाठी निवीदा मागविण्यात येत आहे. निवीदा क्रमांक काअ./ पंढरपूर / तां/टी–१२ ते १४ २०२२–२३ असुन,निविदा विक्री दि. २०.०३.२०२३ ते २४.०३.२०२३ पर्यंत आहे. निविदा सादर करण्याची अंतिम दि. २५.०३.२०२३ दुपारी. १४.०० वाजेपर्यंत राहील. सदर तपशील महावितरण कंपनीच्या अधिकृत https:/ works.mahadiscom.in/eTender/etender संकेतस्थळावर उपलब्ध असेल. सदरील निविदा स्वीकारणे / नाकारणे अथवा रद्द करण्याचे संपुर्ण अधिकार निम्न स्वाक्षरीदाराकडे राहतील.

**ऑफीसचा पत्ता :–** कार्यकारी अभियंता, पोल फॅक्टरी जवळ, लिंक रोड, पंढरपूर, ता. पंढरपूर, जि. सोलापूर

पीआरओ.२०६/२०२२–२३ कार्यकारी अभियंता (संवसु) पंढरपूर



## 'पंचायत राज' अभियानात अक्कलकोट पं.स. प्रथम

✔ सुराज्य/सोलापूर : शासनाच्या 'यशवंत पंचायत राज अभियान २०२२-२३ मध्ये पुणे विभागात अक्कलकोट पंचायत समितीने उत्कृष्ट कामगिरी करत प्रथम क्रमांक पटकाविला आहे. यावेळी गटविकास अधिकारी सचिन खुडे यांचा अधिकारी व कर्मचाऱ्यांकडून जंग्गी सत्कार करण्यात आला. ग्रामीण महाराष्ट्राच्या विकासासाठीच्या योजना पंचायत राज संस्थेमार्फत राबविल्या जातात. यासाठी राज्यात पंचायत राज संस्थांमधून प्रशासकिय व्यवस्थापन व विकास कार्यात उत्कृष्ट काम करणाऱ्या जिल्हा परिषद व पंचायत समित्यांसाठी हे पुरस्कार घोषित केले जातात. शाश्वत विकास ध्येय अंतर्गत १७ उद्दिष्टे आणि ९ संकल्पना यामध्ये उत्कृष्ट काम करणाऱ्या पंचायत समित्यांची विभाग स्तर आणि राज्य स्तरावर निवड करून राष्ट्रीय पंचायतदिनी पुरस्कार देऊन गौरविले जाते. त्याअनुषंगाने जिल्हा परिषद, सोलापूर अंतर्गत पंचायत समिती, अक्कलकोटने सर्वोच्च गुण मिळवत पुणे विभागात प्रथम क्रमांक मिळवला आहे.यावेळी गट विकास अधिकारी सचिन खुडे यांचा सत्कार करताना कृषी अधिकारी काटे, विस्तार अधिकारी भिमाशंकर तुळजापूरे, दयानंद परिचारक, निकम, रेवणसिध्द बोरगाव, राहुल शिंदे यांच्यासह पंचायत समितीचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

## अ. भा. एनटीआर चाहत्यांचा हैद्राबाद येथे महामेळावा

✔ सुराज्य/सोलापूर : अखिल भारतीय एनटीआर अभिमान संगमच्यावतीने एनटीआर यांची जन्मशताब्दी आर. सी. कन्वेंशन हॉल येथे साजरी करण्यात आली. यावेळी गणेरी, कार्याध्यक्ष रामोलू पंतलू , श्रीनिवास गणेरी जॉ. सेक्रेटरी, शंकर द्यावरकोंडा, रायलिंग मिड्डापल्ली उपस्थित होते. आंध्र, तेलंगण येथे दि. १५ रोजी बुधवारी हैद्राबाद येथील ज्युबिली हिल्स येथे एनटीआर अभिमान चाहत्यांचा आत्मियता मेळावा पार पडला. भारतातील महाराष्ट्र (सोलापूर), तामिळनाडू, कर्नाटक येथील चाहते उपस्थित राहून एनटीआर यांच्याशी संपर्कात आलेल्या अभिमान यांनी मनोगत व्यक्त केले. भेटीअंतर्गत संस्थेचे अध्यक्ष तिप्पण्णा गणेरी, तिप्पण्णा चिनराज यांनी मनोगत व्यक्त केले तसेच सोलापुरात एनटीआर जन्मशताब्दी व सोलापूर एनटीआर अर्बन संगमचे ५० वर्षपूर्ती कार्यक्रम करण्याचे असल्याने टी. डी. जनार्दन, माजी एम. एल. सी. चेअरमन, ऑल इंडिया एनटीआर संगम व श्रीपत सतीश जॉ. सेक्रेटरी यांना निवेदन देण्यात आले.

## शहरातून तीन दुचाकींची चोरी

✔ सुराज्य/सोलापूर : शहरातून तीन दुचाकी चोरीला गेल्याबाबत दोन पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे. शहरातील जोडभावी पेठ पोलीस ठाणे हद्दीतील मंगळवार पेठ परिसरातून एका दुकानासमोर हँडल लॉक करून लावलेली दुचाकी अज्ञाताने पळवली. याबाबत योगेश सूर्यकांत व्हटे (वय-३२, रा. सिध्देश्वर हौसिंग सोयायटी, भवानी पेठ) यांनी जोडभावी पेठ पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. शिवाय सोलापूर महानगर पालिकेच्या गाळा परिसरात हँडल लॉक करून लावलेली दुचाकी अज्ञात चोराने चोरली. याबाबत विक्रम मच्छिंद्र जाधव (वय-३०, रा. विजयलक्ष्मी नगर) यांनी सदर बझार पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. शिवाय होममैदान परिसरात लावलेली दुचाकी अज्ञाताने चोरली. याबाबत सहदेव शिवाजी सुतार (वय-३२, रा. बिबी दारफळ, उत्तर सोलापूर) यांनी सदर बझार पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. या फिर्यादीवरून अज्ञात चोरांवर गुन्हा दाखल झाला आहे. या घटनेचा तपास पोलीस करत आहेत.

## ट्रॅव्हल्र्सच्या धडकेत कारचालकाचा जागीच मृत्यू

✔ सुराज्य/सोलापूर : ट्रॅव्हल्सने ओम्नी कारला समोरून ठोकरल्याने ओम्नी कार चालकाचा जागीच मृत्यू झाला. शुक्रवारी मध्यरात्रीनंतर बार्शी-कुर्डूवाडी रस्त्यावर हायवे स्टॉपपासून साधारणत: १ किमी अंतरावर हॉटेल साईप्रसाद जवळ हा अपघात झाला. विलास तुकाराम गुरमे (रा. कोल्हे नगर, लातूर) असे यातील मयताचे नाव आहे. त्यांचा मुलगा वैभव विलास गुरमे याने दिलेल्या फिर्यादीवरून मृत्यूस कारणीभूत ठरल्याप्रकरणी ट्रॅव्हल्सचालक किशोर वैजनाथ गताटे, रा काटीजवळगा, ता निलंगा, जि. लातूर याच्यावर बार्शी शहर पोलिसांत गुन्हा दाखल झाला आहे. वैभव हा बारामती येथे इंजिनिअरिंगच्या प्रथम वर्षात शिक्षण घेत आहे तर त्याचे वडिलांचे भांड्याचे दुकान आहे. दि. १७ रोजी दुपारी ४ च्या सुमारास वैभव, विलास व आजोबा असे तिघेजण बारामती येथून ओमीनी गाडी नं. एम. एच. २४ एएस ३५२४ मध्ये लातूरला जाण्यासाठी निघाले होते. विलास हे गाडी चालवत होते. दि. १८ मार्च रोजी रात्री १२.३० च्या सुमारास ते बार्शी हायवे स्टॉपजवळील साईप्रसाद हॉटेलजवळ आले असताना समोरून धाराशिव ते पुण्याकडे जाणाऱ्या शबनम एक्सप्रेस ट्रॅव्हल्स एम. एच. १४ जी डी ७४०० च्या चालकाने भरधाव वेगात अचानक उजव्या हाताला वळण घेऊन ओमिनी कारला जोराची धडक दिली. ओमीनीला दिलेल्या धडकेमुळे समोरचा भाग चेमटून त्यात विलास तुकाराम गुरमे यांचा मृत्यू झाला. वैभव व त्याच्या आजोबास यात किरकोळ दुखापत झाली आहे. अपघातानंतर ट्रॅव्हल्स चालक संबंधितांना उपचारास घेऊन न जाता पळून गेला. भरधाव वेगात वाहन चालवून ओमीनी कारला धडक देवून विलास गुरमे यांच्या मृत्यूस कारणीभूत ठरलयाप्रकरणी ट्रॅव्हल्स चालकावर गुन्हा दाखल झाला आहे.

## ओंकार कारखान्याच्या विस्तारीकरण प्रकल्पांचा भूमीपूजन समारंभ

✔ सुराज्य/पिलीव : माळशिरस तालुक्यातील चांदापुरी येथील ओंकार साखर कारखान्याच्या ३५०० मे. टन गाळप क्षमतेचा विस्तारीकरण प्रकल्प, २० मेगावॅट सहविजनिरमीती प्रकल्प, १५० केलपीडी इथेनॉल प्रकल्प भूमीपूजन समारंभ उद्या स. ११ वाजता चांदापुरीचे सरपंच जयवंत सुळ, चेअरमन बाबूराव बोत्रे-पाटील व मान्यवरांच्या उपस्थितित करण्यात येणार आहे. कार्यक्रमास उपस्थित राहण्याचे आवाहन चेअरमन बाबूराव बोत्रे-पाटील यांनी केले आहे.

## साखरबाई जाधव यांचे निधन



✔ सुराज्य/चिखली : मोहोळ तालुक्यातील चिखली येथील साखरबाई तुकाराम जाधव (वय - ६५) यांचे निधन झाले. त्यांच्या पश्चात पती, दोन विवाहित मुले, एक विवाहित मुलगी, सुना, नातवंडे असा परिवार आहे.

# लव्ह बाईट कॅफेशॉपवर पोलिसांची धाड

## अश्लील चाळे, असभ्य वर्तन करणाऱ्या १६ जणांवर कारवाई

✔ सुराज्य/अकलूज

**अकलूज येथील नवीन बसस्थानकाच्या पाठीमागे बायपास रोड लगत औदुंबरनगरमधील ठवरे बिल्डिंगमधील लव्ह बाईट कॅफे शॉपवर धाड टाकून अश्लील चाळे करून असभ्य वर्तन करत सार्वजनिक शांतता भंग केल्याप्रकरणी अकलूज पोलिसांनी १६ तरुण व तरुणींवर प्रतिबंधात्मक कारवाई केली आहे.**

याबाबत सविस्तर वृत्त असे की अकलूज शहरात अनेक कॅफे शॉप जोरात सुरू असून हे कॅफे शॉप म्हणजे कॉलेज तरुण व तरुणींना राजरोसपणे अश्लील चाळे करण्याचे ठिकाण बनली आहेत.

अकलूजमधील नवीन बसस्थानकाच्या पाठीमागे बायपास रोडलगत औदुंबरनगरमधील ठवरे बिल्डिंगमधील लव्ह बाईट कॅफे शॉप हे ठिकाणही तरुण व तरुणींचे अश्लील



चाळे करण्याचा अड्डाच बनला आहे.

औदुंबरनगर परिसरात मोठमोठी हॉस्पिटल व रहिवासी परिसर असून या परिसरातील लव्ह बाईट कॅफे शॉपमध्ये सतत तरुण व तरुणींचे चालणाऱ्या अश्लील चाळे व धांगडधिंग्यामुळे येथील डॉक्टर मंडळी व नागरिक त्रस्त झाले आहेत. तर या परिसरातील अनेक डॉक्टर व नागरिकांनी हे कॅफे शॉपबद्दल जिल्हाधिकारी सोलापूर यांच्याकडे ऑनलाईन तक्रारी केल्या असल्याची माहिती मिळाली आहे.

अकलूज पोलिसांना याबाबत माहिती मिळाल्यानंतर लव्ह बाईट कॅफे शॉपवर धाड टाकली असता कॅफे शॉपित असणाऱ्या बंदिस्त रुममध्ये काही तरुण व तरुणी बसून अश्लील चाळे करत असभ्य वर्तन करीत असल्याचे दिसून आले. पोलिसांनी १६ जणांना ताब्यात घेत महाराष्ट्र पोलीस अधिनियम ११०/११७ अन्वये प्रतिबंधात्मक कारवाई केली.

सदरची कारवाई सोलापूर ग्रामीणचे पोलीस अधीक्षक शिरीष सरदेशपांडे, अप्पर पोलीस अधीक्षक हिम्मत जाधव, उपविभागीय पोलीस अधिकारी बसवराज शिवपूजे, पोलीस निरीक्षक दिपरत्न गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली महिला पोलीस निरीक्षक स्वाती कांबळे, पोहेकॉँ सुहास क्षीरसागर, रामचंद्र चौधरी, विकि घाडगे, महिला पोलीस नाजनीन तांबोळी आदींनी कारवाई केली. सदर कॅफे शॉपीचा परवाना रद्द करण्याबाबत अकलूज नगरपरिषदेस पत्र देण्यात येणार असल्याचे अकलूज पोलिसांकडून सांगण्यात आले.

अकलूजमध्ये अनेक कॅफे शॉप सुरू असून या कॅफेत आतमध्ये लहान-लहान स्वतंत्र बंदिस्त रुम बनवलेल्या आहेत. या ठिकाणी कॉलेज तरुण व तरुणींचे सतत वर्दळ असते. आतमध्ये बसून तासन्तास तरुण व तरुणी बसून अश्लील चाळे करत असतात.शिवाय कॅफेच्या समोर या तरुणाईचा धांगडधिंगा पाहायला मिळतो. या जोडप्यांकडून भरपूर कमाई होत असल्याने कॅफे शॉपचालकाची भरघोस कमाई होत आहे आणि यामुळेच अकलूज शहरात कॅफे शॉपींचा धंदा फोफावताना दिसत आहे. अकलूजमध्ये सर्वच कॅफे शॉपीत चालणाऱ्या या अश्लील वर्तनामुळे नागरिक त्रस्त झाले असून इतर कॅफे शॉपवर कारवाई होणार का? असे प्रश्न नागरिकांतून विचारले जात आहेत.

## सांगोला एस. टी. आगारातून ८०० महिलांचा पहिल्याच दिवशी अर्ध्या तिकिटात प्रवास

✔ सुराज्य/सांगोला

**महिलांना एसटी प्रवासात ५० टक्के सवलतीच्या शुक्रवारी पहिल्याच दिवशी सांगोला एस. टी. आगारातून ८०० महिलांनी अर्ध्या तिकिटात प्रवास केला आहे. महिला सन्मान योजनेची अंमलबजावणी होताच अर्ध्या तिकिटावरील प्रवासासाठी बस स्थानकावर महिलांनी मोठी गर्दी केली होती. दुसऱ्या दिवशीही महिलांचा एसटी बसच्या प्रवासाला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाल्याचेही अतिरिक्त आगारप्रमुख विकास पारसे यांनी सांगितले.**

शासनाने महिलांसाठी एसटी प्रवासाच्या तिकिट दरात ५० टक्के सवलतीची अंमलबजावणी सुरू केली. शुक्रवारी पहिल्याच दिवशी महिला सन्मान योजना अंमलबजावणी केली. एसटी आगारांमधून ५० एसटी बसेसच्या माध्यमातून ८०० महिला प्रवाशांनी सन्मानचा पन्नास टक्के सवलतीत प्रवास केला आहे. पन्नास टक्के सवलतीच्या दराने मिळालेल्या तिकिटांमुळे प्रवासी महिलामध्ये उत्साहाचे वातावरण दिसून आले.

राज्य शासनाने अर्थसंकल्पातूनच महिला सन्मान योजनेची घोषणा केली होती. या योजनेची अंमलबजावणी आठवडा भरातच सुरू करण्यात आली आहे. राज्य परिवहन मंडळाच्या साधी, मिनी, निमआराम, विनावातानुकूलित स्लिपर, शिवशाही, शिवनेरी, शिवाई अशा सर्व प्रकारच्या एसटी बस प्रवासात ही सवलत लागू झाली आहे. त्यामुळे महिला प्रवाशांनी एकाच दिवसात पन्नास टक्के सवलतीत ८०० प्रवशांनी प्रवास केला असल्याची नोंद परिवहन महामंडळाने घेतली आहे. दररोज वेगवगळ्या ठिकाणी एसटी बसने प्रवास करणाऱ्या प्रवाशांची संख्या ही मोठी आहे. अशातच सरकारने आता एसटी बसेसमध्ये महिलांना तिकिट दरात ५० टक्के सवलत दिली आहे. याचा परिणाम लगेच प्रवाशी संख्येच्या आकडेवारीवरून दिसून आला आहे. ५० टक्के सवलत लागू असल्याने प्रवासी महिलांचा ओढा एसटीकडे वाढला आहे. खासगी बसेसकडून पुन्हा एसटीकडे प्रवासी वळत आहेत. आरामदायी बसेसच्या तुलनेत हा खर्च निम्म्यावर आल्याने या महिलांनी एसटीला पसंती दिली. तसेच वातानुकूलित, स्लिपर वाहनांनाही सवलत असल्याने एसटी प्रवासाकडे आपोआप हा ओढा वाढत आहे. शनिवारी दुसऱ्या दिवशी देखील महिलांची बस स्थानकात गर्दी दिसून आली. एसटीच्या प्रवासाला सर्वाधिक महिलांनी पसंती दिल्याचे निदर्शनास येत आहे.

## १४ हजार रुपयांच्या लोखंडी वायरची चोरी

✔ सुराज्य/कुर्डूवाडी

टेम्पो चालक व मॅनेजर यांनी संगनमताने मालकाच्या परवानगीशिवाय टाटा कंपनीच्या लोखंडाची जी आय वायरची सुमारे ९४ हजारांचे ८ बन्डल परस्पर चोरल्याची घटना दि. १६ रोजी कुर्डूवाडी एमआयडीसी येथील पत्र्याच्या कारखान्यात माल उतरवताना उघडकीस आली. याबाबत पत्राकंपनीचे मालक निलेश धोका यांनी कुर्डूवाडी पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे. चालक मयुर जगताप (अकुलगाव, ता. माढा) व मयुर भोसले (भोसरे, ता. माढा) या दोघांविरुध्द गुन्हा दाखल केली आहे.

याबाबत पोलिसांनी दिलेली अधिक माहिती अशी की, निलेश धोका यांचा कुर्डूवाडी येथे लोखंड विक्री तसेच एमआयडीसी कुर्डूवाडी येथे लोखंडी पत्रे तयार करण्याचा कारखाना आहे. दि. १५ रोजी चालक मयुर संभाजी जगताप, रा. अकुलगाव हा कुपवाडा, सांगली येथून टाटा कंपनीचे टेम्पो नं. एम. एच. १३-सी. यु. ३६९७ या मध्ये टाटा कंपनीची जी. आय. वायरचे ९४ बन्डल एकूण वजन १० टन १४५ किलो घेऊन निघाला होता.

सदरचा टेम्पो दि. १६ रोजी सकाळी ८.५५ वा. एमआयडीसी कुर्डूवाडी येथे फिर्यादीच्या कारखान्यामध्ये आला. त्यावेळी कारखान्याचे वॉचमन सुहास जानराव यांनी टेम्पोचे वजन केले असता नमूद बीलाप्रमाणे वजन कमी असल्याचे निदर्शनास आले. त्यावेळी मॅनेजर मयुर भोसले रा. भोसरे याने वॉचमन जानराव यांना माझे व मालकाचे बोलणे झाले आहे, तुम्ही बीलाप्रमाणे वजन करून द्या, असे खोटे सांगितले,

वॉचमन जानराव याची माहिती फिर्यादी मालकाला दिली असता माहिती दिली असता विचारणा केली असता फिर्यादी धोका लगेच कारखान्यामध्ये आले टेम्पोमध्ये आलेले वायरचे बन्डल मोजले असता ८६ बन्डल असल्याचे निदर्शनास आले. यावरून टेम्पोचा चालक मयुर जगताप, रा. अकुलगाव व मनेजर मयुर भोसले, रा. भोसरे यांनी संगनमत करून टेम्पोमधून ८ टाटा कंपनीचे जी. आय. वायरचे बन्डल परस्पर लबाडीने चोरले असल्याचे उघड झाल्यावरुन धोका यांच्या फिर्यादीवरुन वरील दोघांवर कुर्डूवाडी पोलिसांत गुन्हा दाखल झाला आहे.

## अज्ञात चोरट्याने पळवली दुचाकी

✔ सुराज्य/सोलापूर : अज्ञात चोरट्याने सुगंधा लॉज नवी पेठ दुचाकी क्रमांक एम.एच.१३. बीटी.०६३८ ही रस्त्याच्या कडेला हॅण्डल लॉक करून पार्क करून ठेवली असता चोरून नेली आहे. ही घटना दि. २५ ते २६ फेब्रुवारी दरम्यान घडली. याप्रकरणी संतोष कृष्णा कदम (वय-४८, रा. स्वामी विवेकानंद नगर, हत्तुरे वस्ती) यांनी फौजदार चावडी पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे. त्यांच्या फिर्यादीवरून अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. या घटनेचा पुढील तपास पोलीस नाईक ढोबळे हे करीत आहेत.

## श्री विठ्ठल-रुक्मिणी मूर्ती प्रतिष्ठापना वर्धापन दिनानिमित्त कीर्तन; आजपासून पारायण

✔ सुराज्य/सोलापूर

नेहरू औद्योगिक कामगार सहकारी गृहनिर्माण संस्था क्रमांक २ (बी गट) भैरव कॉलनी, दमाणी नगर, गडदर्शन सोसायटी, सोलापूरमधील श्री विठ्ठल-रुक्मिणी मूर्ती प्रतिष्ठापनेचा प्रथम वर्धापन दिन सोहळा रविवार दि. २६ रोजी साजरा होणार आहे.

२६ रोजी सकाळी १० ते दुपारी १२ या वेळेत गवळी वस्ती येथील हभप माऊली महाराज बचुटे यांचे हरिकिर्तन आणि दुपारी १२.३० ते १ या वेळेत श्री विठ्ठल-रुक्मिणी मंदिरात गुलालाचा कार्यक्रम पार पडेल. दुपारी १ ते ३ या वेळेत गडदर्शन समाज मंदिरात भाविकांसाठी महाप्रसाद ठेवण्यात आला आहे. दुपारी ४ ते ५ या वेळेत मंदिरात महिला भजनी मंडळाचे भजन होईल. त्यानंतर सायंकाळी ५ ते ६ या वेळेत हरिपाठ होणार आहे. त्यानंतर सायंकाळी ७ ते रात्री ९ या वेळेत मंदिरासमोरील प्रांगणात बीड येथील गणेश महाराज वारंगे यांचे हरिकीर्तन होऊन सांगता होणार आहे. तत्पूर्वी सोमवार २० मार्च ते रविवार २६ मार्चपर्यंत दररोज सकाळी ७ ते ११ यावेळेत रमेश महाराज शिवापूरकर यांच्या मार्गदर्शनाखाली विठ्ठल-रुक्मिणी मंदिरात पारायण सोहळ्याचा शुभारंभ होणार आहे.

## नाट्य परिषद शाखेच्या रंगवर्धन उपक्रमांतर्गत गझल कार्यक्रम

✔ सुराज्य/सोलापूर

**अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद, सोलापूर शाखेच्यावतीने रंगवर्धन उपक्रमांतर्गत गझलकारांचा गझल सोलापुरी हा कार्यक्रम शनिवारी नाट्य परिषदेच्या स्व.पद्माकर देव सभागृहात संपन्न झाला. नाट्य परिषदेचे अध्यक्ष प्रकाश यलगुलवार यांनी सर्व मान्यवर सहभागी गझलकरांचा पुष्पगुच्छ देऊन सत्कार केला.**



सदर कार्यक्रमात सोलापूरच्या ख्यातनाम बालरोगतज्ञ डॉ. विद्या देशपांडे यांनी, खोट्याच... दिखाव्याचा..., हा काळ नवा आहे..., यासह सौंदर्य शाप ठरते गरिबाघरी मुलींचे, मनातील कोडी कशी... सोडवावी. या तीन गझल सादर केल्या. तर विजय खाडे यांनी. मी जरासे.. बोललो की, जाळ होतो..., यासह तिला पाहुणे काल पाहून गेले आणि वासना जेव्हा अनावर होते..! या गझला सादर केल्या, त्यानंतर रामप्रभू माने यांनी भरण्यास साक्ष खोटी कोणी बदाम खाल्ले..., यासह लावून आग गेले मोका बघून काही...., आणि हातात हात देण्या वाटेत यार आले. या गझल सादर केल्या.

गझलेबाबत सुरुवातीला सांगून अनेक मराठी उर्दू आणि हिंदी शेरांची सादरीकरण करीत गझलकार कालिदास चवडेकर यांनी कार्यक्रमाचे खुमासदार सूत्रसंचालन केले.

नाजूक सुंदर दरवळ आहे..., गझल सुगंधी वादळ आहे..., थोडे थोडे दूध पाजुनि मांजर केले गेले..., कोणी न गॉडफादर वा खानदान आहे.., हवेवर स्वार झालो मी.. या गझल आणि हझल सादर करून रसिकांना खिळवून ठेवले. आणि गझल मुशायरा रंगतदार केला.

नाट्य परिषदेचे ज्येष्ठ कार्यकारणी सदस्य पद्माकर कुलकर्णी या कार्यक्रमाचे प्रस्तावित करून रंगवर्धन उपक्रमाची माहिती दिली. सुरुवातीला काव्यप्रेमी मंचचे राज्याध्यक्ष आनंद घोडके यांनी संस्थेबद्दल माहिती सांगितली. शेवटी सुनील गुरव यांनी सर्वांचे आभार मानले.

या कार्यक्रमासाठी नाट्य परिषदेचे प्रमुख कार्यवाह जोतिबा काटे, सहकार्यवाह सुमित फुलमामडी, राजा राजेशचंद्र, आनंद खरबस, सुनील गुरव, ज्येष्ठ कवी माधव पवार, कवी मारुती कटकधोंड, गिरीश दुनाखे, डॉ. क्षमा वळसंगकर, रघुनंदन भुतडा, गितेश चुळभरे, मल्लिकार्जुन कावळे, राजू रंगम यांच्यासह नाट्य रसिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## मराठी ओटीटी प्लॅटफॉर्म 'अल्ट्रा झकास'

✔ सुराज्य/सोलापूर : १९८२ पासून मनोरंजन विश्वातील सर्वात अग्रगण्य ''अल्ट्रा मीडिया अँन्ड एंटरटेनमेंट'' तर्फे गुढी पाडव्या निमित्ताने मराठी ओटीटी प्लॅटफॉर्म 'अल्ट्रा झकास' लाँच करण्यात आले आहे. याद्वारे वापरकर्त्यांना अप्रतिम दर्जेदार कंटेंट पाहण्याचा आनंद घेता येणार असून ओटीटीच्या माध्यमातून जगभरातील प्रेक्षकांसाठी नवनवीन चित्रपट, अप्रतिम कंटेंट लायब्ररी उपलब्ध होणार आहे. गुढीपाडव्याच्या शुभ मुहूर्तावर 'अल्ट्रा झकास' ओटीटी प्लॅटफॉर्मवर गाव आले गोत्यात १५ लाख खात्यात' आणि रौद्र'च्या खास प्रीमियरची घोषणा केली.

# जीएसटी व इन्कम टॅक्सवरील कार्यशाळा उत्साहात

✔ सुराज्य/सोलापूर

**'द इन्कम टॅक्स अँड सेल्स टॅक्स प्रॅक्टिशनर्स असोसिएशन' या करसल्लागार संघटनेकडून शनिवारी हॉटेल चित्रा एक्झिक्यूटिव्ह येथे आयोजित कार्यशाळा उत्साहात झाली. 'जीएसटी अपील आणि इन्कम टॅक्सच्या नव्या तरतुदी' हा कार्यशाळेचा विषय होता.**

कार्यशाळेचे उद्घाटन महाराष्ट्र व गोवा बार कौन्सिलचे माजी अध्यक्ष ॲड. मिलिंद थोबडे यांच्या हस्ते करण्यात आले याप्रसंगी व्यासपीठावर ॲड. दीपक बापट, सी. ए. श्रीधर रिसबूड, करसल्लागार संघटनेचे अध्यक्ष विश्वंभर पाटील, सचिव ॲड. अक्षय अंदोरे उपस्थित होते.

ॲड. थोबडे म्हणाले, 'प्रवाहात राहण्यासाठी कर सल्लागारांना नियमांची माहिती असणे आवश्यक आहे. 'द इन्कम टॅक्स अँड सेल्स टॅक्स प्रॅक्टिशनर्स असोसिएशनने जीएसटी आणि इन्कम टॅक्सबाबत कार्यशाळा आयोजित करुन कर सल्लागारांसाठी मार्गदर्शन उपलब्ध करून देण्याचा उपक्रम कौतुकास्पद आहे, असेही ॲड. थोबडे यावेळी यांनी सांगितले. या कार्यशाळेत ॲड. दीपक बापट यांनी जीएसटी अपील करण्याबाबतच्या तरतुदींबाबत मार्गदर्शन केले तर श्रीधर रिसबूड यांनी अर्थसंकल्पातील इन्कम टॅक्सबाबतच्या नव्या तरतुदी या विषयावर मार्गदर्शन केले.ॲड. दीपक बापट यांनी जीएसटी अपीलबाबत कर सल्लागारांना मार्गदर्शन केले. जीएसटीच्या नियमांनुसार चार महिन्यांनंतर अपील दाखल करता येत नाही. त्यामुळे याबाबत कर सल्लागारांनी कोणती काळजी घ्यावी.

सी. ए. श्रीधर रिसबूड म्हणाले, 'नव्या अर्थसंकल्पातील तरतुदींनुसार पाच लाखांच्यावर जर विमा असेल तर ते करपात्र उत्पन्न ठरणार आहे. नव्याने



लागू होत असलेल्या करप्रणालीबाबतही श्रीधर रिसबूड यांनी मार्गदर्शन केले.'

याप्रसंगी संघटनेचे उपाध्यक्ष ॲड. विनायक नगरकर, सहसचिव अविनाश म्हेत्रे, ॲड. एम. पी. कोरुलकर, ॲड. राजेंद्र केसकर, ॲड. विजयकुमार कोनापुरे, ईद्रीस बागवान, ॲड. रुद्रमणी हिरेमठ, ॲड. संजीवकुमार कोणशिरसगी, ॲड. कमलेश नागर, ॲड. किसन बिल्ला, ॲड. विकास कोडमूर, ॲड. श्रीकांत चिपडे, ॲड. मोहसीन दूरगकर आदी उपस्थित होते.'द इन्कम टॅक्स अँड सेल्स टॅक्स प्रॅक्टिशनर्स असोसिएशन'चे अध्यक्ष विश्वंभर पाटील यांनी प्रास्ताविक केले. ॲड. मोहसीन दुरुगकर, ॲड. बी. एस. श्रीचिप्पा यांनी सूत्रसंचालन तर सचिव ॲड. अक्षय अंदोरे यांनी आभार प्रदर्शन केले.



## शिंदेवाडी परिसरातील वीजपुरवठा सुरळीत करा : ग्रामस्थांचे निवेदन

**नातेपुते** : शिंदेवाडी येथील ढेंबरे वस्ती, कदमवस्ती, मोरे वस्ती, गणेश मंदिर, मसुगडे वस्ती याभागातील विजेचा लपंडाव पंधरा दिवसापासुन सूरू आहे. त्यामुळे शेतातील पिके डोळ्यासमोरच करपू लागल्यामूळे शेतकरी संतापला आहे. त्यामुळे या परिसरातील सुरळित व्हावा. यासाठी ग्रामस्थांनी महिवितरणचे उपकार्यकारी अभियंता किरण डोईफोडे, आनंद जाधव यांना निवेदन दिले. यावेळी राजेंद्र मोरे, रवि मोरे, दत्तात्रय शिदे, अशोक भोसले, यशवंत शिदे, दिलिप शिदे, हणमंत पाटणे, उमेश मोरे, पिंटू जगदाळे!अतूल मोरे, दादा मोरै, विजय जाधव, पिंटू शिदे, भरत शिंदे, प्रकाश शिंदे आदी उपस्थित होते. शिदेवाडी येथील शेतीचा विजपुरवठा सुरळित करण्यासाठी (२०००) मेगॉवॅटचा सोलर प्रकल्प होणार आहे. हा प्रकल्प पूर्ण झाल्यास त्या भागातील विजेची समस्या सुटणार आहे. एकशिव येथील नवीन सब स्टेशनचे काम लववकरच चालू होत आहे. त्यामुळे विजेचा लोड कमी होणार आहे, असे उपकार्यकारी अभियंता किरण डोईफोडे यांनी सांगितले.




## गृहविज्ञान महिला महाविद्यालयात तीन दिवसीय कार्यशाळा

**अकलूज** : अकलूज येथील शिक्षण प्रसारक मंडळ संचलित व एस. एन. डी. टी. महिला विद्यापीठ, मुंबई संलग्नित श्रीमती रत्नप्रभादेवी मोहिते-पाटील गृहविज्ञान महिला महाविद्यालयात नांदी फाउंडेशन, हैद्राबाद व महिंद्रा प्राइड क्लासरूम यांच्या संयुक्त विद्यमाने गृहविज्ञान शाखेमध्ये शिकणाऱ्या विद्यार्थीनिंसाठी तीन दिवसीय प्रत्यक्ष कार्यकृती कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. कार्यशाळेमध्ये विद्यार्थिनींच्या सर्वांगीण विकासासाठी आवश्यक असणारी कौशल्ये जसे की, संभाषण कला, धेय निश्चिती, वेळेचे व्यवस्थापन, व्यावसायिक संप्रेषण पद्धती, मुलाखत कला, समस्या निवारण, देहबोली इत्यादी विषयाच्या अनुषंगाने हकीम लकडावाला यांनी विद्यार्थिनींना कार्यानुभवाच्या माध्यमातून अत्युच्च दर्जाचे प्रशिक्षण या कालावधींत दिले. या प्रशिक्षणाचा विद्यार्थीनींना नौकरी व स्वयंरोजगार या क्षेत्रामध्ये मोलाचा लाभ होऊ शकेल. महिला सबलीकरनाच्या उद्देशाने महिंद्रा प्राइड क्लासरूम व नांदी फाउंडेशन यांनी महाविद्यालयाला सदर कार्यशाळा आयोजित करण्याची संधी दिल्याबद्दल महाविद्यालय विकास समितीच्या अध्यक्षा मा. स्वरुपाराणी जयसिंह मोहिते-पाटील यांनी आभार मानले. सदर कार्यशाळा महाविद्यालयाच्या अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष व प्लेसमेंट सेल विभागाच्या वतीने संपन्न झाली. अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. राहुल सुर्वे हे होते. प्रास्ताविक प्लेसमेंट सेलचे प्रमुख प्रा. अमित घाडगे यांनी केले, सूत्रसंचालन डॉ. ऋषी गजभिये व आभार प्रदर्शन आय. क्यू. ए. सी. समन्वयक डॉ. राजश्री निंभोरकर यांनी केले. कार्यशाळेसाठी डॉ. जयशीला मनोहर, डॉ. भारती भोसले, डॉ. छाया भिसे, प्रा. के. के. कोरे, रमजान शेख व विद्यार्थीनी यांनी परिश्रम घेतले.



## प्राचार्य बेबी करवीर राजमाता जिजाऊ पुरस्काराने सन्मानित

**अक्कलकोट** : अक्कलकोट तालुक्यातील रूद्देवाडी येथील माध्यमिक व उच्च माध्यमिक आश्रम प्रशालेचे प्राचार्य बेबी अण्णाराव करवीर यांना आज सोलापूर येथील हिराचंद नेमचंद वाचनालय सभागृह येथे राज्यस्तरीय 'राजमाता जिजाऊ पुरस्कार' देऊन सन्मानित करण्यात आले.यावेळी अध्यक्ष म्हणून सचिन वायकुळे,सहायक पोलीस आयुक्त दीपक आडवे,उप मुख्य कार्यकारी अधिकारी जावेद शेख, आविष्कार फौंडेशनचे संस्थापक अध्यक्ष संजय पवार, जब्बार शिकलगार,बापू जमादार,अण्णाराव करवीर,रेखा सोनकवडे,आदी मान्यवर उपस्थित होते. अविष्कार फौंडेशन च्या वतीने दरवर्षी महिला दिनाचे औचित्य साधून समाजातील विविध क्षेत्रातील उल्लेखनीय कार्य करणाऱ्या महिलांचा राज्यस्तरीय 'राजमाता जिजाऊ पुरस्कार' देऊन सन्मानित करण्यात येते,यंदा हा पुरस्कार प्राचार्य बेबी करवीर यांना प्राप्त झाल्याने त्यांचे तालुक्यातून सर्वत्र अभिनंदन होत आहे.

## आयशर टेम्पोच्या धडकेत दुचाकीस्वार ठार

**सांगोला** : भरधाव आयशर टेम्पो चालकाने दुचाकीस समोरून जोराची धडक दिल्याने दुचाकी वरील एक जण गंभीर जखमी होऊन उपचारादरम्यान मयत झाल्याची घटना रविवार दि. १८ मार्च रोजी रात्री नऊच्या सुमारास गोडसेवाडी, कमलापूर ता. सांगोला येथील सर्विस रोडवर घडली आहे. संजय बबन डोले (वय ४४ रा. कमलापूर ता. सांगोला) असे अपघातात मरण पावलेल्या दुचाकी चालकाचे नाव होय. संजय बबन ढोले (रा. कमलापूर ता. सांगोला) हे १८ मार्च रोजी रात्री नऊच्या सुमारास एमएच ४५ झेड ५१६२ या दुचाकीवरून कमलापूर ता. सांगोला येथे आपल्या घराकडे जात असताना समोरून एमएच ४५ ए एफ ५०१७ या आयशर टेम्पो चालकाने आपल्या ताब्यातील वाहन सर्विस रोडवर चुकीच्या दिशेने निष्काळजपणाने चालवून दुचाकी चालकास धडक दिल्याने या अपघातात संजय ढोले हे गंभीर जखमी झाले. संजय ढोले यांना सांगोला येथे रुग्णालयात दाखल केले परंतु अत्यवस्थ अवस्थेत पुढील उपचारासाठी मिरज येथील दवाखान्यात दाखल केले. असता संजय ढोले यांचा उपचारा दरम्यान मृत्यू झाल्याची घटना घडली आहे. याबाबत पोलिसांनी अज्ञात आयशर टेम्पो चालका विरुद्ध आपल्या ताब्यातील वाहन चुकीच्या दिशेने निष्काळजीपणे चालवून अपघातास कारणीभूत ठरुन दुचाकी चालकाच्या मृत्यूस कारणीभूत ठरल्या प्रकरणी गुन्हा नोंद केला आहे.

# कुर्डुवाडीत वाहतुकीची कोंडी

**सुराज्य/कुर्डुवाडी**




कुर्डुवाडी शहरातील मध्यवर्ती ठिकाणच्या आझाद मैदानातील भाजीविक्रेते फळे व भाजी विक्री करण्यासाठी मुख्य रस्त्यावर अतिक्रमण करुन बसत आहेत. त्यामुळे दररोज वाहतुकीची कोंडी होत आहे. याचबरोबर मुख्य रस्त्यावर, प्रत्येक चौकातील बेशिस्त वाहन पार्किंगमुळे ज्येष्ठ नागरिक व महिलांना याचा त्रास सहन करावा लागत आहे. या प्रश्नाकडे नगरपालिका प्रशासन व पोलिसांनी संयुक्त मोहिम राबवून वाहतुकीची कोंडी सोडविण्याची मागणी नागरिकांतून होत आहे.

शहरातील बालोद्यान चौक ते सातव कॉलनी असा मुख्य रस्ता असून या रस्त्यावरून न.पा. कार्यालय, रेल्वे स्टेशन, पंचायत समिती कार्यालय, ग्रामीण रुग्णालय,दोन शाळा, एक महाविद्यालय तसेच माढा येथील कोर्ट व तहसील कार्यालयात जाण्यासाठी रस्त्यावर मोठ्या प्रमाणात वाहतूक असते. मात्र या मुख्य रस्त्यावर दोन्ही बाजूला अतिक्रमणे केल्यामुळे रस्ते अरुंद झाले आहेत. याच रस्त्यावर बेशिस्त वाहन पार्किंग व प्रवासी रिक्षा भाडे घेण्यासाठी उभे असल्यामुळे दिवसभर या मार्गावर वाहतुकीची कोंडी होत असल्याचे चित्र दिसत आहे. तर आझाद मैदानावर मोठ्या प्रमाणात भाजी विक्रेत्यांसाठी जागा उपलब्ध आहे. मात्र स्थानिक भाजी विक्रेते मोठ्या प्रमाणात जागा घेऊन बसले आहेत. त्यामुळे ग्रामीण भागातून येणाऱ्या शेतकऱ्यांना भाजी विक्री करण्यासाठी जागा दिली जात नसल्यामुळे शेतकऱ्यांना नाइलाजाने रस्त्यावर बसावे लागत आहे.

स्थानिक विक्रेतेही आझाद मैदानात तसेच रस्त्यावर भाजी विक्रीसाठी बसू लागले आहेत. याकडे नगरपालिका प्रशासन, आरोग्य अधिकारी अनेक वेळा तोंडी तक्रार देऊनही जाणीवपणे दुर्लक्ष करीत असल्याचे दिसत आहे. तरी न.पा. प्रशासनाने याकडे लक्ष देण्याची गरज आहे.

**मोठ्या शेतकऱ्यांसाठी आंदोलन, छोट्या शेतकऱ्यांसाठी काय?**

ऊस उत्पादक बागायत शेतकऱ्यांसाठी शेतकरी संघटना आंदोलन करतात. मात्र छोट्या भाजीविक्रेत्याच्या प्रश्नाकडे शेतकरी संघटने लक्ष दिल्याचे कधी ऐकिवात नाही. आता तरी या संघटना या छोटे शेतकरी कष्टकरी यांच्याकडे लक्ष देतील का असा सवाल उपस्थित केला जात आहे. शहरातील गांधी चौक, शिवाजी चौक, टिळक चौक, स्टेशन चौक, पोलीस स्टेशन बालोद्यान गेट समोर बेशिस्त वाहन पार्किंग केली जात आहे. याकडे पोलीस प्रशासन काना डोळा करत असल्याचे दिस चित्र दिसत आहे. बेशिस्त वाहन पार्किंगवर कडक कारवाई करण्याचे मागणी महिला व ज्येष्ठ नागरिकांतून होत आहे.

**वाहतूक कोंडीमुळे रुग्णवाहिका अडकली**

शहरातील मुख्य रस्त्यावर वाहतुकीची कायम कोंडी होत असल्यामुळे अत्यावश्यक सेवा देणाऱ्या रुग्णवाहिकेलाही वाहतूक कोंडीचा सामना करावा लागत आहे. अशा वेळी जर काही अनुचित प्रकार घडलाच तर कोण जबाबदार असा सवाल उपस्थित केला जात आहे. तरी वेळीच नगरपालिका व पोलिस प्रशासनाने याकडे लक्ष देऊन वाहतूक कोंडी दूर करुन नागरिकांची होणारी गैरसोय दूर करावी.

## सहकार महर्षी धान्य दुकानदार संघटनेचा दिल्लीतील आंदोलनात सहभाग

**सुराज्य/अकलूज**



रेशन दुकानदारांच्या विविध मागण्यासाठी दिल्ली येथे आंदोलन सुरू असून या आंदोलनामध्ये माळशिरस तालुक्यातील सहकार महर्षी स्वस्त धान्य दुकानदार संघटनेने सहभाग नोंदवत आंदोलनाला पाठिंबा दिला.

ऑल इंडिया फेयर प्राईज शॉप डीलर फेडरेशनचे राष्ट्रीय अध्यक्ष डी सी कटारिया व राष्ट्रीय प्रधान सचिव देवन रजक ऑल महाराष्ट्र फेयर प्राईज शॉप किपर महाराष्ट्र राज्य संघटनेचे सचिव विजयजी गुप्ता, महाराष्ट्र राज्याचे सेक्रेटरी बाबुराव मम्हाणे व सोलापूर जिल्हा अध्यक्ष पेंटर बंधु यांच्या मार्गदर्शना खाली जंतर-मंतर, नवी दिल्ली येथे एक दिवसिय धरणे आंदोलन व उपोषण स्वस्त धान्य दुकानदारांच्या विविध मागण्यासाठी करण्यात आले होते यामध्ये माळशिरस तालुक्यातील सहकार महर्षी शंकरराव मोहिते पाटील रास्त भाव धान्य दुकानदार संघटनेचे अध्यक्ष विजय मंडलिक व संघटनेचे पदाधिकारी समवेत जाहीर पाठिंब्यासाठी जंतर मंतर नवी दिल्ली येथे उपस्थित होते.

यावेळी संपूर्ण भारतामध्ये राष्ट्रीय अन्न सुरक्षा अधिनियम २०१३ वन नेशन वन रेशन योजना सुरू केलेले असून याच धर्तीवर देशामधील दुकानदारांना समान कमिशन मिळावे याकरिता वन नेशन वन रेशन वन कमीशन अशी योजना केंद्राने तयार करावी किंवा सर्व दुकानदारांना शासकिय सेवेत समाविष्ट करून वेतन द्यावे, जर का यासाठी सुद्धा अडचण येत असेल तर प्रत्येक दुकानदारांना कमीत कमी तीन हजार लोकसंख्येचे धान्य प्रति क्विंटल ४६० रुपये कमीशन प्रमाणे देण्यात यावे.अश्या विविध प्रलंबित दहा सुत्री मागण्या तात्काळ पूर्ण कराव्यात अन्यथा येणाऱ्या काळात दुकानदाराचे माध्यमातून याचे वाईट परिणाम शासनाला दिसुन येतील, असे मनोगत माळशिरस तालुका अध्यक्ष विजय मंडलिक यांनी या वेळी व्यक्त केले.

देशभरातील अनेक राज्यातील संघटनेचे पदाधिकारी व दुकानदार तसेच माळशिरस तालुक्याचा वतीने धान्य दुकानदार अध्यक्ष विजय मंडलिक, संजय खराडे, अरुण जाधव, अक्षय मिले, सूरज साखरे, रणजीतसिंह भगत आंदोलनात आधी उपस्थित होते.



## जाधव कुटुंबीयांचे परिसरातील जनसामान्यांसाठी मोठे कार्य : पाटील

**सुराज्य/वेळापूर**

मळोली तालुका माळशिरस येथील पंचायत समितीचे सदस्य व मळोली ग्रामपंचायतीचे मार्गदर्शक रणजीतसिंह जाधव कुटुंबीयांचे या परिसरातील सर्वसामान्य जनतेसाठी मोठे कार्य असून शिक्षण क्षेत्रातही त्यांनी चांगले काम केले असल्याचे प्रतिपादन पत्रकार निनाद पाटील यांनी केले ते मळोली तालुका माळशिरस येथील जनता विद्यालयातील विद्यार्थ्यांना पंचायत समितीचे सदस्य रणजीतसिंह जाधव यांच्या वाढदिवसानिमित्त राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हा उपाध्यक्ष प्रभाकर इंगळे सर देशमुख व हरप्पा नारायण जाधव यांच्यावतीने वह्या वाटपाच्या कार्यक्रमाप्रसंगी ते बोलत होते.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मळोली सरपंच सौ अर्चना रणजीतसिंह जाधव या होत्या. व्यासपीठावर मळोली सरपंच सौ अर्चना जाधव, नानासाहेब पाटील, सुरेशदादा जाधव, प्रभाकर इंगळे सर देशमुख, हरीआप्पा जाधव, ज्ञानेश्वर ढेंबरे, पर्यवेक्षक तानाजी लवटे, संजय गुजर, पत्रकार निनाद पाटील, श्रीनिवास कदम पाटील, महादेव जाधव आदी उपस्थित होते. प्रारंभी सर्वांचे स्वागत पृथ्वीराज जाधव यांनी केले. यानंतर सरपंच अर्चना जाधव, पत्रकार निनाद पाटील, श्रीनिवास कदम पाटील, महादेव जाधव आदींच्या हस्ते वह्यांचे वाटप करण्यात आले. यावेळी निनाद पाटील म्हणालेकि रणजीत सिंह जाधव यांच्या वाढदिवसानिमित्त वह्या वाटपाचा कार्यक्रम हा चांगला उपक्रम असून वह्या वाटप करण्या पाठीमागची भावना चांगली आहे या माध्यमातून गोरगरीब विद्यार्थ्यांना मोठी मदत होत असल्याचे यावेळी निनाद पाटील यांनी सांगितले.

या कार्यक्रमाला जनता विद्यालयाचे सर्व शिक्षक वर्ग विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन पृथ्वीराज जाधव यांनी केले.

## आईला काठीने बेदम मारहाण; दारूच्या नशेत मुलाचे कृत्य

**सुराज्य/मोहोळ**



दारूच्या नशेत मुलाने आईला काठीने बेदम मारहाण केल्याची धक्कादायक घटना चिखली (ता. मोहोळ) येथे घडली. याप्रकरणी मुलावर मोहोळ पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. मल्लिकार्जुन दत्तात्रय तोडकर (वय २३, रा. चिखली, ता. मोहोळ) असे गुन्हा दाखल झालेल्या मुलाचे नाव आहे.

याबाबत पोलिसांनी दिलेली माहिती अशी की, शशिकला दत्तात्रय तोडकर (वय ४६, रा. चिखली, ता. मोहोळ) या घरकाम करीत आहेत. गुरुवार, दि. १७ रोजी सायंकाळी साडेपाच वाजण्याच्या सुमारास मुलगा मल्लिकार्जुन याने दारू पिण्यास पैसे का देत नाही म्हणून दारूच्या नशेत असलेल्या मल्लिकार्जुने आईला काठीने बेदम मारहाण केली. त्यांच्या कंपाळाच्या वरच्या बाजूला मारल्याने रक्त येऊ लागले . भांडणाचा आवाज ऐकून पती दत्तात्रय हे सोडवा सोडवी करण्यासाठी आले असता त्यांनाही लाथाबुक्क्यांनी मारहाण करीत शिवीगाळ केली. याप्रकरणी मुलाची आई शशिकला तोडकर यांनी मोहोळ पोलिस ठाण्यात तक्रार दिली. यावरून मोहोळ पोलिस ठाण्यात नोंद झाली असून, अधिक तपास पोलीस उपनिरीक्षक मारुती लोंढे हे करीत आहेत.

## लग्नात मानपान केला नाही म्हणून विवाहितेचा छळ; पतीसह चौघांवर गुन्हा

**सुराज्य/सोलापूर**

तुझ्या वडिलांनी लग्नात हुंडा दिला नाही व योग्य मानपान केला नाही तसेच तुझ्या वडिलांनी दोन तोळे सोने दिले नाही असे म्हणत चार तोळे सोने व चार चाकी गाडी घेण्यासाठी माहेरून पाच लाख रुपये घेऊन ये म्हणून विवाहितेला घरात उपाशी कोंडून शारीरिक व मानसिक त्रास देऊन छळ केल्याप्रकरणी चार जणांविरुद्ध जेलरोड पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

ही घटना सन २०१४ ते ५ ऑगस्ट या कालावधी दरम्यान फिर्यादी यांच्या सासरी घडली. याप्रकरणी नेहा प्रज्योतीपती वास्टर (वय-२७, रा.रविवार पेठ) यांनी जेलरोड पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे. त्यांच्या फिर्यादीवरून पती प्रज्योतीपती यादगीरराव वास्टर,दीर बलभीम यादगीरराव वास्टर,सासरे यादगीरराव विश्वनाथ वास्टर व नणंद वंदना सुनील भालेराव (सर्व रा. जोशी वाडा, हैदराबाद) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. घटनेचा पुढील तपास पोसई मोतेकर हे करीत आहेत.

## एसटीतून प्रवास करताना महिलांनी आपल्या मैल्यवान वस्तूंची काळजी घ्यावी : बागाव



**सुराज्य/वेळापूर**

प्रत्येक महिलांनी प्रवास करताना आपल्या सर्व साहित्याची मौल्यवान वस्तूंची काळजी घेणे गरजेचे आहे, असे आवाहन वेळापूर पोलीस स्टेशन प्रभारी अधिकारी निलेश बागाव यांनी केले.

महाराष्ट्र शासनाने नुकत्याच झालेल्या अर्थसंकल्पामध्ये महिलांसाठी एसटीमध्ये प्रवासासाठी ५० टक्के सवलीतीचा दर ही घोषणा केली आहे व त्याचा महाराष्ट्र शासना चा नुकताच जी आर निघून महिलांना ५० टक्के सवलतीची एसटी प्रवास सुरू झाला असून आता प्रत्येक महिलांना प्रवासामध्ये एसटीत आपापल्या वस्तूंची पिशव्यांचे, बॅगांची, गळ्यातील सोने ,बरोबरची रोख रक्कम याकडे काळजीने लक्ष देणे आता गरजेचे झाले आहे.

कारण महिलांसाठी ५० टक्के प्रवास दर झाल्याने आता महिला महाराष्ट्रातील देवदर्शन, मुलींकडे जाणे, दवाखान्यात औषध उपचारासाठी शहरात जाणे, निसर्गरम्य अशा ठिकाणी फिरण्यास जाणे, विवाह सोहळ्यास जाणे, अशासह अनेक कारणावरून महिला आता एसटी मधून सवलतीच्या दरामध्ये मोठ्या प्रमाणात प्रवास करणार असून त्यामुळे महाराष्ट्रातील एसटीला आता महिलांची मोठी गर्दी होणार आहे. एसटीमध्ये गर्दी असल्यामुळे महिला एसटीमध्ये चढण्याच्या कारणावरून अथवा सीटवर बसण्याच्या कारणावरून महिला आपल्या वस्तूकडे थोडेसे दुर्लक्ष करतात. त्याच काळामध्ये एसटीमध्ये चोऱ्या करण्याच्या बहाण्याने तीन ते चार महिला आपल्याकडेवर लहान मुले बरोबर व छोटी पिशवी घेतलेल्या अशा वर्णनाच्या महिला अथवा चोरीच्या बहाण्याने महिला एसटीमध्ये प्रवेश करून अशा महिला घाई, गर्दीमध्ये आपल्या मौल्यवान वस्तू, साहित्य, सोने अथवा बटवा उघडून त्यामधील पैसे चोरण्याचा अथवा इतर महिलांकडे कडे लांबवण्याचा प्रयत्न करतात.

**प्रलंबित गुन्ह्यांचा निपटारा युद्ध पातळीवर**

# वळसंग पोलीस ठाण्यात अटक वॉरंट बजावण्याची मोहीम जोरात

**सुराज्य/अक्कलकोट**

आयएसओ मानांकन, स्मार्ट पोलीस ठाणे, ऑक्सिजनयुक्त परिसराची बिरुदावली मिरवत असलेल्या वळसंग पोलीस ठाण्याचे प्रभारी अधिकारी सपोनि अनिल सनगल्ले यांनी प्रलंबित गुन्ह्यांचा निपटारा करण्याचे काम हाती घेऊन ते तडीस नेण्याची मोहीम जोरात सुरू केली आहे.

न्यायालयात हजर न होता पोलिसांना हुलकावणी देणाऱ्या सराईत गुन्हेगारांना अटक वॉरंट बजावून त्यांना धडा शिकवण्यात येत आहे. या मोहिमेची कुणकुण लागताच सराईत गुन्हेगार पोलिसांसमोर हजर होऊन शरण जात आहेत. बहुतांश गुन्हेगार कोर्टात हजर होऊन जामिनासाठी प्रयत्न करत आहेत. सपोनि अनिल सनगल्ले यांच्या प्रलंबित गुन्हे निपटारा कामगिरीला चांगला प्रतिसाद मिळत आहे.

या मोहिमेमुळे लवकरच वळसंग पोलीस ठाणे व त्या अंतर्गत येणाऱ्या गोदुताई परुळेकर विडी घरकुल येथील पोलीस चौकी अंतर्गत असलेल्या गुन्ह्यांची निर्गती होणार आहे. यामुळे प्रलंबित गुन्हेमुक्त पोलीस ठाण्याचा मान वळसंग पोलीस ठाण्याला मिळणार आहे.

सोलापूर - अक्कलकोट महामार्ग, तीन सिमेंट कारखाने, दोन साखर कारखाने, अति संवेदनशील कुंभारी येथील गोधुताई परुळेकर विडी घरकुल, कुंभारी, दर्गनहळ्ळी, वळसंग या संवेदनशील ठिकाणांसह ३५ गावांच्या सुरक्षेचा डोलारा वळसंग पोलीस ठाणे सांभाळत आहे.

सोलापूर- हैदराबाद आणि अक्कलकोट-सोलापूर दोन राष्ट्रीय महामार्गामुळे अपघाताचे प्रमाणही अधिक आहेत. अपघातग्रस्तांना मदत करण्याबरोबरच विडी घरकुल येथील किरकोळ घटनेला लागणारा वेळ, यामुळे पोलिसांचा ताण वाढत आहे.

या सगळ्या जबाबदारी पेलत आणि रोज घडणाऱ्या गुन्ह्यांचा छडा लावत गुन्हे निर्गतीची मोहीम जोरात सुरू आहे. आतापर्यंत एका महिन्यात तपास करून ५० खटले न्यायालय दाखल केले आहेत. मृत्यू झालेल्या आठ घटनांचे तपास पूर्ण करण्यात अनिल सनगल्ले यांच्या पथकाला यश आले आहे. प्रलंबित २१६ अटक वॉरंटपैकी २०२ गुन्हेगारांना अटक वॉरंट बजावण्यात आली आहेत. त्यातील अनेकांना अटकही करण्यात आली आहे. एक महिन्याच्या कालावधीत नऊ जुगार अड्ड्यावर धाडी टाकून १० हजार ५%४, तर १८ ठिकाणी सुरू असलेल्या अवैध दारू धंद्यावर धाडी टाकून १० हजार ९६५ रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आले आहे.

पिढीत, अन्यायग्रस्तांना दिलासा देण्याबरोबरच गुन्हेगारांना वळसंग पोलीस ठाणे कर्दनकाळ ठरले आहे. कायदा मोडणाऱ्यांवर खाकिच्या धाकाचे वचक बसत आहे. यामुळे परिसर शांत आहे.

**घरकुलमध्ये आरोपींना शोधणे कठीण...**

कुंभारी विडी घरकुलमध्ये आरोपींचा शोध घेण्यात पोलिसांना असंख्य अडथळ्यांच्या शर्थी पार कराव्या लागत आहेत. आज राहत असलेल्या घरात दुसऱ्या दिवशी आरोपी नसतो. त्याचे ठिकाण, खानाखुणाही बदललेले असतात. शहर जवळ असल्याने लपण्यासाठी त्यांना मोकळीकता मिळते. ही आव्हाने असतानाही त्यांचा शोध घेऊन त्यांच्यावर कारवाई करण्यात येत आहेत.



दैनंदिन कामकाजाबरोबरच अवैध धंद्यावर लक्ष केंद्रित करून धाडी टाकण्यात येत आहेत. हुल्लडबाजी करणारे व समाजकंटक आता रडारवर असतील.

**– सपोनि अनिल सनगल्ले,**
**प्रभारी अधिकारी वळसंग पोलीस ठाणे, वळसंग**

# राहुल गांधींच्या अडचणी वाढल्या?

## नोटीसला उत्तर न दिल्याने दिल्ली पोलीस घरी धडकले

सुराज्य/मुंबई

**काँग्रेस खासदार राहुल गांधी यांनी भारतीय लोकशाहीबाबत लंडनमध्ये केलेल्या वक्तव्यावरून खळबळ माजली आहे. त्यानंतर संसदेत वेगवेगळ्या हालचालींना वेग आलाय. त्यांच्या या वक्तव्यावरून केंद्रीय मंत्र्यांसह भाजप नेत्यांनी राहुल गांधी यांचे लोकसभा सदस्यत्व बरखास्त करण्याची मागणी सुरू केलीय. हे संकट कमी होतं की काय म्हणून राहुल गांधी यांच्यासमोर आणखी एक नवं संकट उभा राहिलंय. राहुल गांधी यांच्या घरी दिल्ली पोलीस दाखल झाले आहेत. विशेष सीपी (कायदा आणि सुव्यवस्था) सागर प्रीत हुड्डा हे राहुल गांधींच्या निवासस्थानी पोहोचले आहेत.**



भारत जोडो यात्रेदरम्यान श्रीनगरमधील लैंगिक पीडितांबाबत त्यांनी वक्तव्य केलं होतं. त्या प्रकरणी राहुल गांधी यांच्यासोबत चर्चा करण्यासाठी दिल्ली पोलीस त्यांच्या घरी पोहोचले आहेत.

या प्रकरणी दिल्ली पोलिसांनी राहुल गांधींना नोटीस बजावून लैंगिक पीडितांची माहिती देण्यास सांगितले होते, मात्र अद्यापपर्यंत राहुल गांधींनी नोटीसला उत्तर दिलेले नाही.

**नक्की काय म्हणाले होते राहुल गांधी?**

भारत जोडो यात्रेदरम्यान श्रीनगरमधील आपल्या भाषणात राहुल गांधी म्हणाले होते की, जेव्हा मी चालत होतो, तेव्हा खूप स्त्रिया रडत होत्या. त्यांच्यापैकी अनेक होत्या, ज्यांनी मला सांगितले की, त्यांच्यावर बलात्कार झाला आहे, त्यांचा विनयभंग झाला आहे. काहींनी सांगितले की, 'त्यांच्या नातेवाईकांनी त्यांचा विनयभंग केला आहे. जेव्हा मी त्यांना विचारले की, मी पोलिसांना सांगायला हवं, त्यांनी मला नको असे सांगितले.' त्या म्हणाल्या, त्यांना मला माहिती द्यायची होती, परंतु त्यांनी दिलेली माहिती मी पोलिसांना सांगू नये, असं त्यांचं म्हणणं होतं. त्या म्हणाल्या की, 'त्यांना आणखी समस्यांना सामोरे जावे लागेल. हेच आपल्या देशाचे वास्तव आहे.'

राहुल गांधी भारत जोडो यात्रेदरम्यान ३० जानेवारी रोजी श्रीनगरमध्ये आले होते. त्यावेळी येथे महिलांचे लैंगिक आणि शारीरिक शोषण होत असल्याच्या तक्रारी आमच्याकडे आल्या असल्याचं राहुल गांधींनी सांगितलं होतं.

राहुल गांधींच्या या वक्तव्यावर नोटीस जारी करून दिल्ली पोलिसांनी त्यांना त्या सर्व महिलांची माहिती देण्यास सांगितले आहे, जेणेकरून त्यावर कारवाई करू शकू, असं पोलिसांनी सांगितलंय. त्यांच्याकडून माहिती मिळवण्याचा प्रयत्न करून त्या महिलांना न्याय मिळावा हा आमचा हेतू आहे, असं सागर प्रीत हुड्डा यांनी सांगितलं.

### काय विचारलंय नोटीसमध्ये?

राहुल गांधी यांच्या विधानानंतर दिल्ली पोलिसांनी त्यांना एक नोटीस बजावली. त्यात राहुल गांधींना काही प्रश्न विचारण्यात आले. तुम्हाला भेटल्यानंतर महिलांनी हे केव्हा आणि कोणत्या ठिकाणी सांगितले?, तुम्ही या स्त्रियांना आधीपासून ओळखत होता का? तुम्ही त्या महिलांना कसे ओळखता? तुम्ही सोशल मीडियावर जे बोलता त्याची तुम्ही शहनिशा करता का? महिलांनी काही विशिष्ट घटनेची माहिती दिली का? अशा अनेक प्रश्नांचा या नोटिसमध्ये उल्लेख करण्यात आला आहे.

नोटीस घेतल्यानंतर बुधवारी दिल्ली पोलिसांचे एक वरिष्ठ अधिकारी राहुल गांधींना भेटायला गेले, मात्र तीन तास प्रतीक्षा करूनही राहुल गांधी त्यांना भेटले नाहीत. दुसऱ्या दिवशी वरिष्ठ अधिकारी पुन्हा त्यांना भेटण्यासाठी गेले. त्यांना भेटण्याची आणि चर्चा करण्याची वेळ मागितली. मात्र, आपल्याकडे वेळ नाही, असं राहुल गांधी यांनी त्यांना कळवलं. त्यानंतर पोलिसांनी राहुल गांधी यांना नोटीस बजावली. या प्रकरणाचा वेगाने तपास व्हावा म्हणून या नोटिशीला लवकरात लवकर उत्तर देण्यास पोलिसांनी सांगितलं होतं.

---

## राज्यात ग्रामीण भागातही एसटीच्या ई-बस चालविणे होणार शक्य

सुराज्य/पुणे

राज्य मार्ग परिवहन महामंडळाकडून इलेक्ट्रिक बसची सेवा ग्रामीण भागापर्यंत पोहोचावी; म्हणून राज्यात १०१ डेपो व इतर अशा १७२ ठिकाणी चार्जिंग स्टेशन उभारण्यात येणार आहेत. त्यामुळे ग्रामीण भागातही एसटीच्या ई-बस चालविणे शक्य होणार आहे.

राज्याचा २०२३-२४चा अर्थसंकल्प नुकताच सादर झाला. यात राज्य परिवहन महामंडळासाठी नवीन पाच हजार १५० ई-बस खरेदी करणार असल्याची घोषणा केली होती. अर्थमंत्र्यांच्या घोषणेनंतर दुसऱ्या दिवशीच या बसखरेदीची प्रक्रिया



सुरू झाली. एसटी महामंडळाने नऊ मीटरच्या २,३५० आणि १२ मीटरच्या २,८०० ई-बसची निविदा काढली. या ई-बससाठी एसटी महामंडळाने १०१ डेपोंमध्ये १७२ ठिकाणी चार्जिंग स्टेशन उभारण्याचा निर्णय घेतला आहे. ही चार्जिंग स्टेशन कंत्राटदारांनीच बांधायची आहेत. त्याची देखभाल, दुरुस्तीही कंत्राटदाराने करायची आहे. या बस पुणे, मुंबई, नाशिक, नागपूर या शहरांसह ग्रामीण भागातही धावणार आहेत, अशी माहिती एसटीचे व्यवस्थापकीय संचालक शेखर चन्ने यांनी दिली.

राज्य सरकारने महिला प्रवाशांना एसटीच्या प्रवासात ५० टक्के सवलत देण्याचा निर्णय घेतल्यामुळे फायदा होणार आहे. यामुळे एसटीकडे प्रवासी वाढणार आहेत,' असे एसटीचे व्यवस्थापकीय संचालक शेखर चन्ने यांनी सांगितले.

**ई-बसची वैशिष्ट्ये...**

* ई-बसची प्रवासी क्षमता : ४२, * एक वेळेस चार्जिंग केल्यानंतर ३०० किलोमीटर धावणार, * बस पूर्ण वातानुकूलित असणार, * बसमध्ये चार्जिंग सुविधा असणार, * स्वयंचलित दरवाजे.

## सुनावणीवेळी मांडलेले मत म्हणजे निकालाचा संकेत नाही : सरन्यायाधीश

सुराज्य/मुंबई

**आपल्या न्यायालयांमधील बहुतांश युक्तिवाद हे बार आणि खंडपीठ यांच्यातील संवाद असतात. बोलताना एखाद्याला रोखले जाते, विनोद केला जातो, गंभीर वाद घातला जातो वगैरे वगैरे, हा आपल्या संस्कृतीचाच भाग आहे. सुनावणीदरम्यान न्यायमूर्तींनी व्यक्त केलेले मत म्हणजेच त्याअनुषंगाने निकाल दिला जाण्याचे संकेत नाहीत, असे भारताचे सरन्यायाधीश धनंजय चंद्रचूड यांनी स्पष्ट केले.**


एका इंग्रजी वृत्तवाहिनीने आयोजित केलेल्या चर्चासत्रात सरन्यायाधीश चंद्रचूड यांनी हे मत व्यक्त केले. न्यायालयांमध्ये दोन प्रकारचे न्यायाधीश असतात. एक जे विरोधी मत व्यक्त करत वकिलांना प्रोत्साहित करतात तर, दुसरे युक्तिवाद वाढवून तार्किक निष्कर्षापर्यंत नेतील. अशा वेळी न्यायाधीशांद्वारे व्यक्त केले जाणारे मत सोशल मीडियाच्या माध्यमातून सर्वांसमोर जाते, तेव्हा न्यायाधीश असा विशिष्ट निर्णय घेतील, असा लोकांना वाटू लागते; जे प्रत्यक्षात वास्तव नसते. शेवटचा युक्तिवाद होत नाही, तोपर्यंत खटल्याचा निर्णय होत नाही, असे सरन्यायाधीशांनी सांगितले.

## आता मालगाड्याही धावणार विजेवर

सुराज्य/छत्रपती संभाजीनगर

**मनमाड ते छत्रपती संभाजीनगर दरम्यान रेल्वे मार्गावरील विद्युतीकरणाचे काम पूर्ण झालेले आहे. या मार्गाचा उपयोग करण्यास सुरुवात करण्यात आली. मुंबई येथील जेएनपीटी येथून ४० कंटेनर घेऊन लोको ट्रेन दौलताबाद कंटेनर डेपोत १७ मार्च रोजी दाखल झाली.**

### जेएनपीटीहून कंटेनर घेऊन आली पहिली मालगाडी



गेल्या वर्षी मनमाड ते छत्रपती संभाजीनगर दरम्यान रेल्वे विद्युतीकरणाचे काम करण्यात आले. या रेल्वे मार्गाची तपासणीही करण्यात आली. या तपासणीनंतर छत्रपती संभाजीनगर ते जालना दरम्यान विद्युतीकरण कामाची सुरुवात करण्यात आली आहे. खते घेऊन १७ मार्च रोजी मालगाडी येणार होती.

काही तांत्रिक कारणामुळे ही रेल्वे डिझेल इंजिनवर आणण्यात आली. यामुळे या विद्युतीकरणाची तपासणी करण्यासाठी जेएनपीटी मुंबई येथून दौलताबादला सोडण्यात आली.

जेएनपीटी येथून ४० कंटेनर घेऊन रेल्वे इलेक्ट्रिकवर रेल्वे दौलताबाद येथे दाखल करण्यात आली. या रेल्वेचे स्वागत स्थानिक रेल्वे अधिकाऱ्यांनी केले. यानंतर छत्रपती संभाजीनगर आणि दौलताबाद येथे येणाऱ्या मालगाडी विजेवर धावणार असल्याची माहिती रेल्वे सूत्रांनी दिली.

## महिलांना एसटी बसमध्ये ५० टक्के सूट मिळताच कंडक्टरची बेक्कार अवस्था



### व्हिडिओ तुफान व्हायरल

**सुराज्य/बीडः शासनाने घेतलेला एसटी प्रवासात महिलांना ५० टक्के प्रवासमध्ये सूट दिल्यानंतर प्रवासासाठी महिलांची मोठी गर्दी पाहायला मिळाली. मात्र, सध्या सोशल मीडियावर लाल परीच्या प्रवासाचा आस्वाद घेण्यासाठी भरगच्च महिला एसटीत चढत असतानाचा व्हिडिओ आणि त्यानंतर कंडक्टर चक्क एसटी बसच्या सीटाहून तिकीट काढतानाचा व्हिडिओ सध्या सोशल मीडियावर चांगलाच व्हायरल होत आहे.**

सोशल मीडियाच्या व्हिडिओमध्ये दिसत असलेली एसटी बस आणि हा व्हिडिओ नेमका कुठला हे समजू शकला नाही. मात्र, सध्या या व्हिडिओमुळे बस कंडक्टरची तारेवरची कसरत पाहायला मिळाली आणि त्यानंतर बसमध्ये बसणाऱ्या महिलांची तुडुंब गर्दी या दोन व्हिडिओ सध्या सोशल मीडियावर चर्चेचा भाग ठरत आहेत.

कंडक्टर चक्क प्रवासी बसलेल्या शिटावरून चालत तिकिट काढताना दिसत आहे. हीच तारेवरची कसरत लोकांमध्ये चर्चेचा भाग ठरत आहे. सरकारने ५० टक्के महिलांना सूट दिल्यानंतर महिला १००% प्रवास हा एसटी महामंडळाने करताना आणि महिलांचा वाढता उत्साह या ठिकाणी पाहायला मिळत आहे.



## परवानगी नाकारली तरीही सकल हिंदू समाजाचा मोर्चा

सुराज्य/औरंगाबाद

**औरंगाबादचे छत्रपती संभाजीनगर असे नामांतर करण्यास केंद्र सरकारने मंजुरी दिल्यानंतर एमआयएमचे खासदार इम्तियाज जलील यांनी या निर्णयाला विरोध केला.**

**नामांतराच्या निर्णयाला विरोध करण्यासाठी इम्तियाज जलील हे साखळी उपोषणाला बसले होते. तर आता या नामांतरणाच्या समर्थनात सकल हिंदू समाजाकडून जनगर्जना मोर्चा छत्रपती संभाजीनगर येथे काढण्यात आला आहे.**

रविवार (ता. १९ मार्च) छत्रपती संभाजीनगर येथे सकल हिंदू समाजाकडून नामांतरणाच्या समर्थनात जनगर्जना मोर्चा काढण्यात आला आहे. पोलिसांकडून या सभेला परवानगी नाकारणीयता आली होती. पण तरी देखील हा मोर्चा काढण्यात आला आहे.

या मोर्च्याला हजारोंच्या संख्येने लोक उपस्थित राहिले असून मोर्चा शांततेच्या मार्गानेच होणार असल्याची माहिती जिल्ह्याचे पालकमंत्री संदीपान भुमरे यांच्याकडून देण्यात आली आहे.

## केवळ सुट्ट्या दिसतात, काम किती बघा ना : सरन्यायाधीश



**सुराज्य/मुंबई** : अनेकदा न्यायालयातील प्रलंबित प्रकरणांवरून सवाल केले जातात, तसेच कोर्टाच्या सुट्ट्यांवर बोललं जातं. परंतु सर्वोच्च न्यायालयाचे सरन्यायाधीश डी. वाय. चंद्रचूड यांनी न्यायाधीशांच्या कामांचा आणि सुट्ट्यांचा हिशोब मांडला आहे. ते म्हणाले की, 'न्यायाधीश वर्षातले २०० दिवस न्यायालयात काम करतात. ते सुट्टीवर असले तरी त्यांच्या डोक्यात न्यायालयातील प्रलंबित प्रकरणं, कायदे आणि नियम हेच सगळं सुरू असतं. थोडाफार वेळ मिळतो त्यातही ते त्यांच्या कामाचाच विचार करत असतात.

एका खाजगी वृत्तवाहिनीशी बोलताना सरन्यायाधीश म्हणाले की, 'न्यायाधीश आठवड्याचे सातही दिवस काम करतात. सोमवारपासून ते शुक्रवारपर्यंत सर्वोच्च न्यायालयातील न्यायाधीश हे दररोज ५० ते ६० प्रकरणं ऐकतात. अनेकदा निर्णय राखून ठेवले जातात. त्यामुळे शनिवारी न्यायाधीश त्यांचे निर्णय लिहिण्यात व्यस्त असतात. रविवारी ते सोमवारची तयारी करतात. जगभरातील इतर देशांमधील सुप्रीम कोर्टात कसं काम चालतं आणि भारतातलं काम कसं चालतं यातला फरकदेखील सरन्यायाधीशांनी सांगितला.

## काही निवृत्त न्यायाधीश भारतविरोधी टोळीतील, किरेन रिजिजू भडकले



**सुराज्य/मुंबई** : न्यायाधीशांची नियुक्ती करणाऱ्या न्यायवृंद पद्धतीवर विधिमंत्री किरेन रिजिजू यांनी सातत्याने टीका-टिप्पणी केल्याचं पाहायला मिळालं आहे. अशातच रिजिजू यांनी निवृत्त न्यायामूर्तींबाबत एक विधान केलं आहे. देशातील काही निवृत्त न्यायमूर्ती भारतविरोधी टोळीतील आहेत, असा गंभीर आरोप रिजिजू यांनी केला आहे. रिजिजू यांच्या वक्तव्याने चर्चांना उधाण आलं आहे. तर, यावरून काँग्रेसने रिजिजू यांच्यावर टीकास्त्र डागलं आहे.

## इम्रान यांची परतपाठवणी, अटक वॉरंट रद्द



**सुराज्य/लाहोर** : पाकिस्तानचे माजी पंतप्रधान इम्रान खान यांना शनिवारी इस्लामाबाद अतिरिक्त जिल्हा आणि सत्र न्यायालयाने आवारातूनच परत जाण्याची परवानगी दिली. त्यानंतर न्यायालयाने तोशाखाना प्रकरणात खान यांच्याविरुद्धचे अटक वॉरंटही रद्द केल्याचे वृत्त आहे. न्यायालयाच्या आवाराबाहेर इम्रान खान यांच्या समर्थकांची मोठी गर्दी झाली होती, यापूर्वीच्या सुनावणींना वारंवार गैरहजर राहिल्यामुळे त्यांना अटक करण्याचा प्रयत्न करणारे पोलीस आणि समर्थक यांच्यात संघर्ष झाला. त्यानंतर न्यायालयाने इम्रान यांची सही न घेता हजेरी नोंदवली आणि त्यांच्यावर दोषारोप न ठेवताच न्यायालयाने त्यांना परत जाण्यास परवानगी दिली.

## पवारांच्या तुकड्यांवर कोण जगतंय; कदमांनी राऊतांना दिला टोला

**सुराज्य/लाहोर** : भाजपाचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी भाजपा-शिवसेनेमधील (शिंदे गट) जागावाटपावरून केलेल्या वक्तव्यानंतर शिवसेनेच्या ठाकरे गटाने शिंदे गटावर टीका सुरू केली आहे. त्यानंतर खासदार संजय राऊत यांनी फेकलेल्या तुकड्यांवर जगणारे हे लोक आहेत, अशा शब्दात शिंदे गटावर हल्लाबोल केला.

# शेतकऱ्याचा मुलगा बनला डीवायएसपी



सुराज्य/पुणे

**महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्यावतीने २०२१मध्ये घेण्यात आलेल्या परीक्षेचा निकाल नुकताच जाहीर झाला. या परीक्षेत यशस्वी होत किरण पोपळघट यांनी ६७वी रँक मिळवून पोलीस उपअधीक्षक पदाला गवसणी घातली आहे. स्पर्धा परीक्षेचा अभ्यास करत असताना स्वत:ची स्पर्धा स्वत:शीच करत. आई-वडिलांनी दिलेल्या पाठिंब्यामुळे त्यांचा विश्वास सार्थकी लावत. योग्य व काटेकोरपणे नियोजन करत. स्पर्धा परीक्षेला सामोरे जात किरण पोपळघट याने पोलीस उपअधीक्षक पदाला गवसणी घातली आहे. परिस्थिती नसताना त्याने यशाचे शिखर गाठून ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांसमोर एक आदर्श निर्माण केला आहे. या यशाबद्दल त्याचे सर्वत्र कौतुक होत आहे. त्याच्या यशातून अनेकांना प्रेरणा मिळाली आहे.**

किरणचे वडील देविदास पोपळघट हे एक शेतकरी आहेत. तर त्यांची आई शशिकला एक गृहिणी आहेत. किरणचा भाऊ रणजीत हा शिक्रापूर येथील वेस्ट इंडिया फोर्जिंग लिमिटेड या कंपनीत उपव्यवस्थापक म्हणून काम करीत आहे. तर त्यांचा दुसरा भाऊ सुनील हा हडपसर - रामटेकडी येथील एसआरपीएफ येथे कार्यरत आहेत. या यशासाठी किरणला आई शशिकला, वडील, दोन भाऊ आणि पुणे येथील अॅकॅडमीचे शिक्षक प्रा. मनोहर बोळे व प्रा. रंजन कोळंबे यांचे मार्गदर्शन मिळाले.

किरणचे प्राथमिक शिक्षण हिंगणगाव येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत तर माध्यमिक शिक्षण अष्टापूर येथील न्यू इंग्लिश मीडियम स्कूलमधून सन २००८मध्ये पूर्ण केले. त्यानंतर त्याने कोथरूड येथील महाराष्ट्र ऑफ टेक्निकल इन्स्टिट्यूट अर्थात एमआयटीतून (MIT) डिप्लोमा इन मेकॅनिकल इंजिनिअरिंग (यांत्रिकी अभियंता) तर पुढे बॅचलर ऑफ इंजिनिअरिंगची पदवी यांत्रिकी अभियंता (Mechanical Engineering) यामधून २०१४मध्ये पूर्ण केली.

घरची आर्थिक परिस्थिती हलाखीची असल्याने किरण चतुर्श्रुंगी येथील विद्यार्थी सहाय्यक समिती वस्तीगृहात राहिला. तसेच विद्यापीठाच्या 'कमवा व शिका' या योजनेतून त्याने उदरनिर्वाह करून शिक्षण पूर्ण केले आहे. शिक्षण पूर्ण झाल्यावर त्याने तळेगाव दाभाडे येथे जेसीबी इंडिया लिमिटेड या कंपनीमध्ये सन २०१४ ते २०१६ या कालावधीत काम केले. पण लहानपणी मोठे होऊन अधिकारी होण्याचे स्वप्न त्याला झोपू देत नव्हते. त्यामुळे किरणने नोकरीला रामराम ठोकला आणि स्पर्धा परीक्षेचा अभ्यास सुरू केला.

दरम्यान, सन २०१७, २०१८, २०१९ व २020 मध्ये घेण्यात आलेल्या चारही वर्षी परीक्षा पास झाला. पण किरण गुणवत्ता यादीत बसला नाही. परंतु, किरणने खचून न जाता पुन्हा अभ्यासाची जोरदार तयारी सुरू ठेवली.

२०२१मध्ये घेण्यात आलेल्या परीक्षेत चांगल्या गुणांनी पास झाला असून त्याची पोलीस उपअधीक्षक पदावर निवड झाली आहे. आणि तो लवकरच महाराष्ट्र पोलीस अॅकॅडमीत प्रशिक्षणासाठी जाणार आहे.




## काय म्हणतयं? पॉलिटिक्स

# भाजपच्या निवडणुकीचे नेतृत्व आता यंग ब्रिगेडच्या हाती

**अजित उंब्रजकर**

**आगामी लोकसभा आणि विधानसभा निवडणूक डोळ्यासमोर ठेवून भाजपने आतापासूनच सोलापूर शहर आणि जिल्ह्यात मोर्चेबांधणी सुरू केली आहे. या निवडणुकीचे नेतृत्व आता भाजप यंग ब्रिगेडच्या हाती देण्याच्या विचारात आहे. शहर आणि जिल्ह्यातील दोन लोकसभा आणि जास्तीत जास्त विधानसभेच्या जागा तसेच महापालिका जिंकण्याचा भाजपचा प्रयत्न आहे. त्यासाठी आमदार सचिन कल्याशेट्टी, आमदार राम सातपुते यांच्यासह उदय पाटील, मनीष देशमुख, किरण देशमुख यांच्यावर आगामी काळात मोठी जबाबदारी येण्याची शक्यता वर्तवली जात आहे. ही यंग ब्रिगेड भाजपला संपूर्ण जिल्ह्यात वर्चस्व निर्माण करून देणार का? याची उत्सुकता लागली आहे.**



**आ. कल्याणशेट्टी झाले फडणवीसांचे खास –** शहर आणि जिल्ह्यात अनेक वरिष्ठ नेते असतानाही सचिन कल्याणशेट्टी या युवा नेत्याला पक्षाने जिल्हाध्यक्ष पदाची जबाबदारी दिली आहे. कल्याणशेट्टी हे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अत्यंत जवळचे मानले जातात. सध्या सोलापूर शहर आणि जिल्ह्याच्या निर्णय प्रक्रियेतील ते एक सदस्य झाले आहेत. पहिल्यांदाच निवडून आलेल्या आ. कल्याणशेट्टी यांनी या आपल्या आमदारकीच्या कार्यकाळात अक्कलकोटमध्ये कोट्यवधीचा निधी आणला आहे. विस्ताराची चर्चा निघाली की, त्यांचे नाव चर्चिले जाते. त्यांच्यावर आगामी काळात सोलापूर लोकसभा तिसऱ्यांदा जिंकण्याची मोठी जबाबदारी त्यांच्यावर देण्यात येण्याची शक्यता आहे.



**सातपुते सोलापूर लोकसभेचे उमेदवार? –** माळशिरसचे आमदार राम सातपुतेहेही अल्पकाळात संपूर्ण राज्यात प्रसिद्ध झाले आहेत. तळागाळातील प्रत्येक प्रश्न ते विधानसभेमध्ये पोटतिडकीने मांडताना दिसतात. तेही उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे निकटवर्तीय मानले जातात. त्यामुळेच २०१९ मध्ये शेवटच्या क्षणी त्यांना माळशिरसमधून विधानसभेची उमेदवारी देण्यात आल्याचे बोलले जात आहे. एक तळागाळातील आणि जमिनीवरचा कार्यकर्ता म्हणून त्यांची ओळख झाली आहे. आता त्यांच्या नावाची चर्चा सोलापूर लोकसभेसाठीही होत आहे. तसे झाल्यास प्रथमच एका युवा नेत्याला सोलापूर लोकसभेसाठी उमेदवारी मिळणार आहे.



**दक्षिणमध्ये मनीष देशमुखांकडे महत्वाची जबाबदारी –** आमदार सुभाष देशमुख यांचे चिरंजीव मनीष देशमुख यांच्याकडेही पक्षाने भाजप युवा मोर्चाच्या प्रदेश उपाध्यक्ष पदाची जबाबदारी दिली आहे. शहरात सध्या युवकांचे संघटन करणे, बूथनिहाय मेळावे घेणे यासह पक्षाने दिलेली विविध कामे मनीष देशमुख करताना दिसत आहेत. आगामी काळात होणाऱ्या महापालिका निवडणुकीत त्यांची भूमिका खास करून दक्षिण मतदार संघात महत्त्वाची मानली जात आहे. या मतदारसंघातून जर जास्तीत जास्त भाजपचे नगरसेवक निवडून आणण्यात त्यांना यश मिळाल्यास आगामी २०२४ च्या विधानसभा निवडणुकीत त्यांचा दक्षिण विधानसभा मतदारसंघातून विचार होऊ शकतो, अशी शक्यता वर्तवण्यात येत आहे.



**उदय पाटलांवर येणार महत्वाची जबाबदारी –** सध्या भाजपमध्ये उदय पाटील यांचे नाव मोठ्या प्रमाणात चर्चेले जात आहे. त्यांचा २१ मार्च रोजी मुंबईमध्ये प्रवेश होत आहे. लिंगायत समाजातील ते एक युवा नेते आहेत. मध्यंतरी त्यांच्या निवासस्थानी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे कट्टर समर्थक श्रीकांत भारतीय यांनी भेट देऊन त्यांना पक्षात देण्याचे आमंत्रण दिले होते,ते आमंत्रण उदय पाटील यांनी स्वीकारले आहे. नवे वर्ष –नवे संकल्प अशी सोशल मीडियावर पोस्ट करत उदय पाटील भाजपमध्ये येण्यास सज्ज झाले आहेत. आगामी काळात सोलापूर लोकसभेसाठी भाजप उमेदवाराच्या मागे त्यांना आपली ताकद दाखवावी लागणार आहे. येथील यश–अपयशावर त्यांचा आगामी विधानसभेसाठी विचार केला जाण्याची शक्यता वर्तवली जात आहे.



**किरण देशमुख महापौरपदाचा नवा चेहरा? –** माजी पालकमंत्री विजय देशमुख यांचे चिरंजीव किरण देशमुख यांच्याकडेही शहर उत्तर मधील युवा नेतृत्व म्हणून पाहिले जात आहे. पालकमंत्र्यांचे चिरंजीव ही ओळख करून त्यांनी स्वतःची उत्कृष्ट नगरसेवक म्हणून ओळख निर्माण केली आहे. त्यांनी आपल्या नगरसेवकाच्या फंडातून तसेच आमदार फंडातून अनेक विकास कामे आपल्या प्रभागात केली आहेत. आगामी महापालिका निवडणुकीत शहर उत्तर मधून उमेदवारी देताना त्यांची ही भूमिका महत्त्वाची मानण्यात येत आहे. भाजपला बहुमत पुन्हा एकदा महापालिकेत मिळाल्यास जास्तीत जास्त वाटा त्यात शहर उत्तरच असणार आहे असे झाल्यास महापौर पदासाठीही ऐन वेळेला किरण देशमुख यांचे नाव पुढे येईल, असे बोलले जात आहे.

महापालिका असो पंचायत समिती असो किंवा लोकसभा, विधानसभा निवडणूक असो. भाजप प्रत्येक निवडणुकीत वेगवेगळी रणनीती आखत असते आणि प्रत्येक निवडणूक जिद्दीने लढत असते, अशी पक्षाची ख्याती आहे. त्याचाच एक भाग म्हणून २०२४ मध्ये होणाऱ्या लोकसभा आणि विधानसभा निवडणुकीमध्ये एक हाती सत्ता मिळवण्यासाठी भाजपाने आतापासूनच सुरुवात केली आहे. त्यासाठी प्रत्येक खासदारकीची जागा आणि विधानसभेची जागा भाजपसाठी महत्त्वाची आहे. सोलापूर शहर आणि जिल्ह्यात अकरा विधानसभा आणि दोन लोकसभा मतदारसंघ येतात. या सर्व जागांवर ताबा मिळवण्यासाठी भाजपाने आतापासूनच व्यूहरचना आखण्यास सुरुवात केली आहे. त्यासाठीच यंग ब्रिगेडला पुढे करण्यात येत आहे. याची सुरुवात आमदार सचिन कल्याणशेट्टी यांच्यापासून करण्यात आली आह.

# आ. रणजितसिंहांच्या प्रभावशील नेतृत्वाची पुनश्च प्रचिती

**डी.एस.गायकवाड**

कोट्यवधी रुपयांच्या विकास निधीची अतिवृष्टी करून आमदार रणजितसिंह मोहिते पाटील यांनी आपल्या दमदार नेतृत्वाची प्रचिती पुन्हा एकदा दिली आहे. हिवाळी अधिवेशनाप्रमाणेच अर्थसंकल्पीय अधिवेशनात सुद्धा तालुक्यासाठी व जिल्ह्यासाठी भरीव निधीची तरतूद करून आपल्या नेतृत्वाची ताकद आ.मोहिते–पाटील यांनी दाखवून दिली आहे. त्यामुळे मोहिते पाटील यांच्या नेतृत्वाचा प्रभाव ठळकपणे जिल्ह्याच्या राजकारणावर आणखी गडद होताना दिसत असून या निमित्ताने भविष्यातील राजकारणात अनेक घडामोडी झालेल्या पहावयास मिळणार आहेत.

नुकतेच झालेले अर्थसंकल्पीय अधिवेशन सोलापूर जिल्ह्यासाठी लाभदायक ठरले असून विशेषतः माळशिरस तालुक्यासाठी ते खूप दिवसाचा अनुशेष भरून काढणारे ठरले आहे. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनाखाली मोहिते पाटील यांनी दिलेल्या जवळपास १४० कोटी रुपयांच्या निधीमुळे तालुक्याचा चेहरा मोहरा बदलणार आहे. अधिवेशनाच्या माध्यमातून आणलेला भरीव निधी सध्या तालुक्यासह सोलापूर जिल्ह्यात चर्चेचा विषय ठरत आहे. माजी उपमुख्यमंत्री विजयसिंह मोहिते पाटील यांच्या पावलावर पाऊल ठेवत त्याच पद्धतीची विकासाची प्रक्रिया ते तीव्रतेने राबवताना दिसत आहेत. काही वर्षात मंदावलेली विकासाची प्रक्रिया आमदार मोहिते पाटील यांनी पुनश्च गतिमान केली आहे. त्यांना फडणवीस यांची मोलाची साथ मिळताना दिसत आहे. इतर आमदारांना अधिवेशन काळात खाली बसा– खाली बसा. थोडक्यात मुद्दे मांडा.



मुद्द्याचे बोला, असे स्पीकरना सांगावे लागते पण मोहिते पाटील यांनी याबाबतीत आपले वेगळेपण जपले आहे. व्यापक जनहिताला हात घालत जनसेवे प्रती आपली तत्परता ते दाखवताना दिसतात. त्यामुळेच अनेक कामांना न्याय मिळताना दिसतो आहे. त्यामुळे राज्याच्या राजकारणात कितीही उलथा पालथी झाल्या तरी सोलापूर जिल्ह्यातील राजकारण्यांची विशेष ओळख या निमित्ताने निर्माण झाली आहे.

### भाजपाकडे नेत्यांचा वाढता कल

मोहिते पाटील हे भाजपात दाखल झाल्यापासून भाजपाला जिल्ह्यातच वेगळीच भरारी प्राप्त झाली असून अनेक तरुण नेतेमंडळी आमदार रणजितसिंह मोहिते पाटील यांच्या माध्यमातून भाजपात प्रवेश करणार असल्याचे वातावरण निर्माण झाले आहे.

# सहकार शिरोमणीची निवडणूक तिरंगी की दुरंगी?

**सूरज सरवदे**

पंढरपूरच्या अर्थकारणातील सहकार शिरोमणी वसंतराव काळे सहकारी साखर कारखान्याची निवडणूक लवकरच लागण्याची शक्यता आहे. यंदाच्या हंगामात चेअरमन कल्याणराव काळे यांनी २,५११ रुपये ऊस दर जाहीर केला आहे तसेच अभिजीत पाटील यांनी कारखान्याची निवडणूक लढवणार असल्याची घोषणा यापूर्वीच केली आहे तर कारखान्याचे माजी संचालक दीपक पवार यांनी सुद्धा निवडणूक लढवण्याची तयारी आधीपासून केली केली आहे. त्यामुळे सहकार शिरोमणी वसंतराव काळे सहकारी साखर कारखान्याची निवडणूक हे तिरंगी होणार की दुरंगी याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

विठ्ठल परिवाराचे नेते कल्याणराव काळे यांनी कारखान्याची निवडणूक बिनविरोध करण्यासाठी प्रयत्न सुरू केले आहेत. त्यासाठी त्यांनी नेत्यांच्या गाठीभेटी सुरू केल्या आहेत. कल्याणराव काळे यांच्या ताब्यातील बँक आणि पतसंस्थेची निवडणूक बिनविरोध करण्यात त्यांना यश आले आहे. त्यामुळे कारखान्याची निवडणूक देखील बिनविरोध व्हावी, असे त्यांचे प्रयत्न सुरू आहेत.





विठ्ठल सहकारी साखर कारखान्याच्या निवडणुकीमध्ये कल्याणराव काळे यांनी भगीरथ भालके यांना सहकार्य केले होते. कल्याणराव काळे यांना विठ्ठल सहकारी साखर कारखान्याच्या निवडणुकीत सहभागी होऊ नये, अशी विनंती अभिजीत पाटील यांनी केली होती, मात्र कल्याणराव काळे परिवाराचे नेते असल्यामुळे त्यांना विठ्ठलच्या निवडणुकीमध्ये सहभागी होणे अनिवार्य होते. त्यामुळे सहकार शिरोमणी वसंतराव काळे सहकारी साखर कारखान्याची निवडणूक ही अभिजीत पाटील लढवणार हे त्यावेळीच निश्चित झाले होते.

दुसऱ्या बाजूला कारखान्याचे माजी संचालक दीपक पवार यांनी सुद्धा निवडणुकीचे रणशिंग फुंकले आहे. ते सभासदांच्या गाठीभेटी घेत आहेत. सत्ताधारी काळे गटांनी विशेष बैठक घेऊन दीपक पवार यांचे सभासदत्व रद्द केले होते. मात्र सहकार मंत्री यांच्याकडे केलेल्या अपीलामध्ये त्यांच्या निर्णयाला स्थगिती देण्यात आली आहे. त्यामुळे अद्याप तरी दीपक पवार यांचे सभासदत्व हे अबाधित आहे. मात्र, ते सहकार मंत्री यांच्या निकालावर अवलंबून असणार आहे.

अभिजीत पाटील यांनी विठ्ठलमध्ये केलेल्या परिवर्तन, त्यांचे दायित्व नसताना दोन वर्षा पूर्वीचे ऊस बिल देणे, उसाला २५०० रुपये भाव देणे, अशा अनेक कारणांमुळे पाटील यांनी शेतकऱ्यांचा विश्वास संपादन केला आहे. सहकार शिरोमणी वसंतराव काळे सहकारी साखर कारखान्याच्या निवडणुकीमध्ये दीपक पवार यांची ताकद निवडणूक जिंकण्यासाठी पुरेशी नाही. विठ्ठल कारखान्यातील सोबती युवराज पाटील आणि गणेश पाटील हे अद्यापही त्यांच्यासोबत सभासदांच्या गाठीभेटी घेताना दिसत नाहीत. त्यामुळे पाटील यांच्यासोबत हात मिळवणी करणे गरजेचे आहे. मात्र पाटील हे विठ्ठल कारखान्याप्रमाणे एकटे निवडणूक लढणार की दीपक पवार यांना सोबत घेणार हे अद्याप स्पष्ट दिसत नाही.

### निवडणूक लांबवण्याचा प्रयत्न

जिल्हा सहकारी निवडणूक अधिकाऱ्याने मतदार यादी सादर करण्याचे आदेश दिले. त्यानंतर देखील सहकार शिरोमणी वसंतराव काळे सहकारी साखर कारखान्याने मुदतीत मतदार यादी जमा केल्या नाहीत. कारखान्याने मतदार याद्या जमा करण्यासाठी पंधरा दिवसाची मुदत मागितली. कारखान्याने मागितलेली मुदत ही निवडणूक अधिकाऱ्यांनी फेटाळल्यानंतर देखील तेरा दिवसांनी मतदार यादी जमा केले आहेत. मात्र जमा केलेल्या मतदार याद्या महाराष्ट्र सहकारी संस्था नियम आणि संस्था सभासद यादी नमुन्यात सादर केली नाही. त्यामुळे पुन्हा निवडणूक अधिकाऱ्यांनी विहित नमुन्यात मतदार यादी सादर करण्याचे आदेश कारखान्याला दिले आहेत. एकंदरीत कारखान्याकडून निवडणूक लांबवण्याचे प्रयत्न दिसून येत आहेत. वेळ काढुपणा सुरू आहे. मतदार यादी देताना विहित नमुन्यात न दिल्यामुळे सत्ताधाऱ्यांचे मनोबल निवडणुकीपूर्वीच खचल्याचे दिसून येत आहे. सत्ताधाऱ्यांचे पराभूत मानसिकता यावरून स्पष्ट दिसत आहे.

# मिरगणेंचा राजकीय अलिप्ततावाद विरोधकांची डोकेदुखी वाढवणार?

**सचिन अपसिंगकर**

भाजप नेते आणि महाहौसिंगचे माजी सहअध्यक्ष राजेंद्र मिरगणे यांना यांना बार्शी तालुक्यात तसे पहायला गेले तर कोणी थेट विरोधक नाही. मिरगणे यांनी २०१४ साली राजकारणात प्रवेश केला, तेव्हा त्यांनी माजी मंत्री सोपल आणि आमदार राऊत यांच्याबरोबर उघड विरोध घेतला होता. तालुक्याच्या राजकारणात तिसऱ्या शक्तीचा उदय म्हणूनच मिरगणे यांच्याकडे पाहिले गेले. नंतर ते वैराग नगरपंचायत निवडणुकीत मिरगणे अलिप्त होते. आता बार्शी नगरपालिका, पंचायत समिती, जिल्हा परिषद, बाजार समिती या महत्वाच्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका डोळ्यावर आहेत. भावी काळात मिरगणे भाजपामध्ये आपल्या गटाचा वरचष्मा निर्माण होण्यासाठी प्रयत्न करणार की अलिप्तता वाद स्विकारून पडद्यामागे आपल्या विरोधकांना धडा शिकविण्याची भूमिका घेणार याची चर्चा आहे.



सुरूवातीच्या काळात मिरगणे यांचा सोपल आणि राऊत यांच्या बरोबर टोकाचा संघर्ष झाला. मिरगणे यांनी नगरपालिका, बाजार समिती आणि विधानसभेची निवडणूकही लढवली. मिरगणे यांच्या संघटनात्मक बांधणीमुळे त्यांनी तालुक्याच्या राजकारणात आपले पाय घट्ट रोवण्याची तयारी केली आहे, असे जाणवले. मिरगणे यांनी समाजकारणाच्या बाबतीमध्ये मोठी मालीकाच लावली. त्यामुळे त्यांची तालुक्यात चांगली प्रतिमा निर्माण झाली. मिरगणे यांनी भारतीय जनता पक्षाचे कार्य तालुक्यात रूजवले. व्यक्तिनिष्ठ राजकारणाला तिलांजली देत मिरगणे यांनी पक्षीय कार्याला महत्व आणि प्राधान्य दिले. केवळ सहा वर्षाच्या राजकीय कारर्किदीमध्ये मिरगणे यांनी भारतीय जनता पक्षामध्ये आपले स्थान निर्माण केले. तत्कालीन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या निकटवर्तीयांच्या गोटात मिरगणे यांनी आपली विश्वासार्हता निर्माण केली. फडणवीस यांची बार्शी शहर दत्तक घेऊ ही घोषणा देखील त्या काळात गाजली. मिरगणे यांच्या फडणवीस यांच्याबरोबर निर्माण झालेल्या संबंधांची प्रचिती बार्शीकरांना आली. कारण मिरगणे यांनी संतनाथ सहकारी साखर कारखाना, बाजार समिती सारख्या संस्थांचे प्रशासक म्हणून आपली वर्णी लावण्यात यश मिळवले. त्याच बरोबर मिरगणे यांच्या सार्वज़निक गृहनिर्माण क्षेत्रातील कार्याचा व्यापक अनुभव सुध्दा फडणवीस यांनी लक्षात घेतल्याचे सिध्द झाले. मिरगणे यांना राज्यात नव्याने निर्माण झालेल्या महाराष्ट्र गृहनिर्माण विकास महामंडळाचे सहअध्यक्ष पद मिळाले. या सहअध्यक्ष पदाला कॅबिनेट मंत्री पदाचा दर्जा लाभलेला होता. हे पद मिरगणे यांनी दीड वर्ष भूषवले. राज्यात झालेल्या सत्तांतरानंतरही त्यांचे पद लवकर बरखास्त झाले नाही. याला मिरगणे यांनी त्या पदाच्या माध्यमातून केलेले कामच कारणीभूत होते.

### कोणाला विरोधक मानणार?

आता बार्शीमध्ये राऊत हे आमदार झाले. नंतर ते भाजपाकडेच झुकले. राऊत आणि मिरगणे यांच्यात मिरगणे यांच्या राजकीय प्रवेशापासूनच शितयुध्द सुरू आहे. राऊत हे देखील फडणवीस यांचे समर्थक मानले जातात. या पार्श्वभूमीवर आता मिरगणे हे कोणाला विरोधक मानतात, हे बार्शीकरांना कळेल. तो पर्यंत मात्र त्यांचा अलिप्ततावाद हा त्यांच्या विरोधकांची डोकेदुखी वाढविणाराच ठरणार आहे.

# भावी नगरसेवकांनी बांधलेले बाशिंग झाले जड

**उल्हास पाटील**

नगरपालिकेची पंचवार्षिक मुदत संपून दीड वर्ष उलटले असून अनेक भावी नगरसेवक गुडघ्याला बाशिंग बांधून बसलेल्या इच्छुक उमेदवारांनी बाशिंगाचे बळ खूपच जड असल्याचे पाहून आता बाशिंग उतरवून ठेवत घरात बसल्याचे दिसून येत आहे.

कुर्डूवाडी नगरपालिकेचा गत पंचवार्षिक काळ या ना त्या कारणाने सतत पाच वर्षे चर्चेत राहिला. पाच वर्षात कोटींची उड्डाणे उडाली. तशा नागरिकांतून सोशल मिडियाच्या माध्यमातून चर्चा रंगल्या. चर्चे तून अनेकांना नगरसेवक पदाचे आकर्षण निर्माण झाले तारीख तिथी आणि मुहूर्ताची वेळ न पाहताच गुडघ्याला बाशिंग बांधून सज्ज झाले. निवडणुकीच्या रिंगणात उतरायचे म्हटले तर नुसती इच्छा असून चालत नाही तर लक्ष्मीची कृपाही असावी लागते, असे जुने जाणते जाणकार त्यांना सांगत आहेत. जसा नगरपालिकेचा पंचवार्षिक काळ संपू लागला, तसे इच्छुक मंडळी रोज आपल्या वार्डातील बारसे,साखरपुडा, लग्न, निवृत्ती समारंभ, हळदी कुंकू, वाढदिवस, मतदारांच्या जन्म– मृत्यूच्याही नोंदी ठेऊन जिथे असेल तिथे उपस्थित राहून मतदारांना आपलेसे करण्याचा प्रयत्न करताना दिसत होती.

शिवाय वार्डात मेंबर मेंबर म्हणून नावे चर्चेला येऊ लागली. मग आता हवा इतकी भरली होती यंदा आपण मेंबर झालोच अशी दिवास्वप्नही त्यांना पडू लागली. ती सत्यात उतरवण्यासाठी निवडणूक लढवायची म्हटले की, कार्यकर्ते,मित्र मंडळी यांना जपावे लागणार तर मग खर्च तर होणारच ना! सुमारे दीड वर्ष सगळा लवाजामा संभाळून अद्याप निवडणूक कार्यक्रम जाहीर होईना म्हटल्यावर मेंबरचा खिशातून हातच बाहेर निघेना तसे कार्यकर्तेही मागे दिसेनात मग काहींनी यंदा आपले बाशिंग बळ फार जड दिसतेय म्हणून बाशिंग उतरवायला सुरुवात केली असल्याची चर्चा शहरात रंगलीय.

# रमेश कदम यांच्या सुटकेमुळे मोहोळमधील समीकरणे बदलणार?



**संजय आठवले**

मोहोळचे माजी आमदार रमेश कदम यांच्या सुटकेमुळे मोहोळच्या राजकारणाची समीकरणे बदलणार असल्याची चिन्हे दिसत आहेत. मागच्या विधानसभा निवडणुकीत कदम यांनी तुरूंगात असतानाही २५ हजार मते मिळवली होती. आता त्यांची कोणत्या पक्षाशी जवळीक होणार ? अन कोणत्या पक्षातून उमेदवारी दाखल करणार याची उत्सुकता लागली आहे.

कदम यांनी २०१४ मध्ये मोहोळ विधानसभा मतदार संघातून राष्ट्रवादी काँग्रेस कडून निवडून लढवली होती. माजी आमदार राजन पाटील अनगरकर आणि राष्ट्रवादीचे तत्कालीन जिल्हा अध्यक्ष मनोहर डोंगरे यांनी त्यांना अवघ्या १६ दिवसांत कदम यांना निवडून आणले. त्यापूर्वी प्रा लक्ष्मण ढोबळे हे मोहोळचे आमदार होते. प्रा ढोबळे व कदम यांचे चांगले संबंध होते. नंतर कदम हे अण्णाभाऊ साठे महामंडळाचे अध्यक्ष झाले. नंतर महात्मा फुले सूत मिलवर कदम यांच्या उपस्थितीत कार्यकत्याचा मेळावाही घेण्यात आला होता. त्यानंतर प्रा ढोबळे यांच्या कारर्किदीत महामंडळाचा कर्ज वाटपाचा मोठा कार्यक्रम घेण्यात आला. त्यावेळेपासूनच कदम यांचे मोहोळ मतदार संघात वजन वाढण्यास सुरूवात झाली.

ढोबळे यांचा कालावधी संपत आला होता आणि मालकांना नवीन माणूस पाहिजे होता. कदमांनी मोहोळची विधान सभेची उमेदवारी मिळण्यासाठी आपल्या दूतामार्फत प्रयत्न चालू केले होते. वरच्या पातळीवर माजी उपमुख्यमंत्री अजित पवार यांचा व त्यांचा मैत्री संबध असल्याचे ऐकीवात आहे तसेच मातंग समाज अभ्यास आयोगाचेही कदम अध्यक्ष होते. त्यामुळे त्यांची व अजित पवारांच्या संबंधांची चर्चा होतीच. त्यामुळे फक्त स्थानिकांच्या होकाराची गरज होती, ती त्यांनी मिळवली. अन कदमांचे तिकिट जाहीर झाले कदम यांना ६२,१२० मते मिळाली आणि ते मोहोळचे आमदार झाले. त्यावेळी ढोबळे यांनी अपक्ष म्हणून निवडणूक लढवली. त्यांना १२ हजार १४ मतावर समाधान मानावे लागले होते

निवडून आल्यावर आ. रमेश कदमांनी नव्या जोमाने नव्या उत्साहाने मतदारसंघातील नागरिकांच्या समस्या जाणून घेतल्या. अन विकास कामांचा धडाका लावला. मागेल तेथे रस्ता तयार करून देणे, विंधन विहिरी तयार करून देणे त्यामुळे अल्पावधीत ते लोकप्रिय झाले. अशा परिस्थितीत महत्मा फुले सूत मिलची निवडणूक लागली अन कदमांनी त्यात उडी घेतली. तेथून ढोबळे–कदम संघर्ष सुरु झाला. इकडे कदमांची लोकप्रियता वाढत होती अन तिकडे मुंबईतून महामंडळाच्या भ्रष्टाचाराचे रकाने छापून येत होते. मतदार संघात लोकप्रियता वाढत असतानाच कदमांना अपहार प्रकरणी अटक झाली. सात साडेसात वर्षाच्या कालावधी नंतर त्यांना जामीन मंजूर झाला. लवकरच ते बाहेर येणार आहेत. आता ते पुन्हा एकदा आपले लक्ष्य मोहोळवर केंद्रीत करणार असल्याचे बोलले जात आहे. कदम यांची सध्या राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रवक्ते उमेश पाटील यांची जवळीक आहे. मागच्या महिन्यात त्यांना सोलापूर येथे आणन्यात आल्यानंतर त्यांनी त्यांची भेट घेतली व चर्चाही झाली होती.

### याची आहे उत्सुकता

रमेश कदम यांना राष्ट्रवादी काँग्रेसमधील दादा संधी देणार का ? अन दिली तरी त्यांना नाकारलेल्या पक्षातून ते उभे राहणार का ? भाजपाचे ढोबळे कदमांचा मेळ लागू देतील का ? आणि जर का मागील लोकप्रियतेच्या जोरावर कदमांनी निवडणूक लढवली तर मालकांना अन ढोबळे यांच्याही अडचणीत भर पडणार का? अशी चर्चा उपस्थित होत आहे. एकंदरित कदम यांच्यामुळे मोहोळच्या राजकारणाची समीकरणे बदलणार हे मात्र निश्चित.